मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

परस्परं भावयन्तः

अंक १०५ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ मार्च २०१६

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

*प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना*

*माझा सस्नेह नमस्कार.*

आपल्या मराठे प्रतिष्ठानचे मुखपत्र असलेल्या 'हितगुज'चे सर्वच अंक मूल्यवान असतात. बाहेरगावचे कुलबांधव 'हितगुज'ची आतुरतेने वाट पाहात असतात. 'हितगुज' विषयी वाढणारी ही ओढ मनाला आनंददायी करते.

मंडळी दि. २३ व २४ जानेवारीला सांगली येथे मराठे प्रतिष्ठानचे दहावे कुलसंमेलन भरले होते. त्यावेळी आपली भेट झाली. परस्पर परिचय वाढले. सांगलीकर मराठे मंडळींनी अतिशय नेटकेपणाने सर्वव्यवस्था उत्तम पाहिली. सांगलीकरांचे आदरातिथ्य - पाहुणचार वाखाण्यासारखाच होता. संमेलनाचे आयोजन करण्यासाठी तरुण उत्साही मंडळी झटत होती. त्यांच्या कष्टाचे चीज झाले अशीच संमेलनाला उपस्थित असलेल्या सर्व कुलबांधवांच्या मनात भावना आहे.

सौ. सुयोग वहिनी, संध्याताई खांबेटे, अजिंक्य मराठे यांनी स्वररसात आपल्याला भिजवून टाकले. सुयोगवहिनींच्या गळा जात्याच गोड, सहजपणे समेवर येत होत्या, गाताना कोठेही ओढाताण नाही, धावपळ नाही. तबला-पेटी वाद्यांवर कुरघोडी नाही. सहजपणे सुरांशी लडीवाळपणा करत होत्या. त्यांचे गाणे मनाला आल्हाद देऊन गेले. कितीतरी वेळ स्वर मनात रूंजी घालीत होते. श्रोत्यांच्या गायनाचे यश पद्मभूषण पं.सी.आर व्यास यांच्या गायकीचा वसा आपल्या आवाजाने समर्थपणे पेलणारा गोड गळा सौ. सुयोग मराठे यांना लाभला आहे.

तीच गोष्ट संध्याताईच्या गाण्याची अत्यंत भावनेने म्हटलेले गाणे मनाला भावते आणि हृदयाला भिडते.



दीपप्रज्वलन - सुलभाताई

संध्याताईचे गाणे त्याच प्रकारचे संध्याताई श्रवणीय जितक्या आहे तितक्याच दर्शनीय पण आहेत. शृंगार, भक्ती आणि शांत रसात संध्याताईंनी आम्हाला नाहवून टाकते. त्यांच्या कविताही लाजवाब! संध्याताई आगे बढो. गायनाच्या क्षेत्रात या गुणी गायिकेच्या भविष्यकाळ उज्वल आणि आशादायी असणार आहे हे सांगायला भविष्यवेत्त्याची गरज नाही.

मूळ अलिबागचे पण सध्या नव्या मुंबईत राहणारे तरुण तडफदार गायक श्री. अजिंक्य मराठे यांच्या गाण्याने सकाळ अक्षरशः सूरात सजली. त्यांनी निवडलेली तीन गाणीही अप्रतीम होती. उच्चार स्पष्ट, गेयता, विलोभनीयता, भावमधुरता ही त्यांच्या गाण्याची वैशिष्ट्ये. त्यांचे गाणे उत्कंटा वाढविणारे संपू नये असे वाटणारे. शिवाय हे गायक उच्च शिक्षित आहेत ते वेगळेच. तेव्हा सांगलीच्या खरे मंगल कार्यालयात स्वर

**(पान ३ वर...)**

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com

मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# सांगली कुलसंमेलन : क्षणचित्रे



स्वागताध्यक्ष वि. म. मराठे




वा.ग., मोहनराव – गळाभेट




युवा कलाकार – भूषण




सुस्वर गायन – संध्या खांबेटे




छोटे उस्ताद – देवांग




फुगडी (गोफ) – प्राजक्ता, अपूर्वा, शुभदा, सुनंदा

(...पान १ वरून)



श्रोतृवृंद

गुंजत राहिले संमेलमाच्या निमित्ताने कुलबांधवांनी संगितातली जादू अनुभवली आणि रंगतदार मैफलीच्या गाण्याने सर्व रसिक मंत्रमुग्ध झाले.

**राम-भरत भेट**

सांगली येथील मराठे परिवार संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी दि. २४ जानेवारीला सकाळी ११ वा. सगळी मंडळी नाश्ता-चहापान करून ताजी, टवटवीत उत्साहाने जमली होती. कार्यवाह श्री. हेमंत मराठे सूत्रसंचालन करणार इतक्यात मराठे प्रतिष्ठानचे आधारस्तंभ श्री. वा.ग. मराठे व्यासपीठावर आपल्याशी संवाद साधायला स्वयंस्फूर्तपणे आले. आदल्या दिवशी ते आढेवेढे घेत होते. मी व्यासपीठावर येणार नाही, मला बोलावू नका (मी फक्त बघायचं काम करणार खाली बसून) अशी तंबी त्यांनी आम्हा कार्यकारिणीतील सदस्यांना दिली होती. पण त्यांना एकूणच संमेलनाचा तो 'माहौल' पाहून राहविले नसावे ते व्यासपीठावर हसतमुखाने आले. कुलबांधवांनी टाळ्यांच्या कडकडाटात आपल्याचे स्वागत केले. त्याचवेळी बडोद्याहून आलेले आपले कुलबांधव श्री. मोहनराव मराठे न राहवून व्यासपीठावर आले. वा.गं.नी आणि मोहनरावांनी एकमेकांना मिठी मारली. प्रेमाने अलिंगन दिले. खूप दिवसांनी भेटलो हा आनंद त्यांना लपवता आला नाही.

एकप्रकारे प्रभु रामचंद्र आणि भरत भेटच घडावी असा भास आम्हा उपस्थितांना झाला.

या संमेलनात खाणे आणि गाणे यांची मस्त मेजवानी सर्व कुलबांधवांना मिळाली. संमेलनाच्या निमित्ताने दूरवरून आलेली परिवारातील मंडळी भेटली त्यामुळे परस्पर परिचय झाला. आत्मीयतेचे, जिव्हाळ्याचे नाते वाढायला ऋणानुबंध टिकून राहायला मदत झाली. हेच या संमेलनाचे फलित आहे. सर्वजण आपल्या जबाबदाऱ्या, चिंता, रोजचे दिनक्रम, सगळे सगळे विसरून दोन दिवस संमेलनाचा भार उत्साहात, आनंदाने भारावून गेले होते; संमेलनमय झाले होते. असो. होळीच्या आणि गुढीपाडव्याच्या सर्व हितगुज वाचकांना आणि कुळबांधवांना शुभेच्छा देते

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. १८ फेब्रुवारी २०१६)

## वाचकांचा पत्रव्यवहार

डॉ. सौ. सुमेधाताई
संपादिका 'हितगुज'
मुंबई

**सप्रेम नमस्कार**

**डिसेंबर २०१५ चा 'हितगुज'चा अंक मिळाला.**

'आदर्श गाव' हे काव्य सध्याच्या जीवनाचे स्वप्न पूर्ण होण्यास असे सुख-स्वप्न व्हावे असे वाटते.

'मनाची निगराणी कशी ठेवावी' हे सोप्या भाषेत चांगल्या तऱ्हेने वर्णविले आहे.

'पनवेल ते कोणार्क'चा प्रवास व वर्णन वाचून स्वतः प्रवास केल्याचा भास झाला. मला माझ्या तरुणपणीच्या सायकल प्रवासाची आठवण करून गेला. लेखकाचे कौतुक करावेसे वाटते.

'काव्य जुगलबंदी' सुख शोधणाऱ्या मानवाची धडपड दिसली.

'गोष्ट तशी कचऱ्याची' हा शरद मराठे ह्यांचा अनुभव उत्साही व कष्टाळू माणसाला खूप प्रेरणा देवू शकेल.

वरील सर्व साहित्याचा शिरमोर म्हणावयास हरकत नसावी असा सर्वोत्कृष्ट 'सृष्टीतला समतोल' हा रमाकांत विद्वांस ह्याचा सद्य परिस्थितीचे दर्शन घडविणारा लेख वाचून बरे वाटले. त्यांचे खास अभिनंदन.

**श्री. सदाशिव ब. मराठे** (पृ.क्र. ३८०)
'अन्नपुर्णा' शास्त्रीपोळ,
कोठी चार रस्ता बडोदा (वडोदरा)
फोन : ०२६५-२४२३०५५/२४२८६२८

# निसर्ग रम्य गांव

• **सौ. निलीमा वि. विद्वांस** (पृ. ६५८), बदलापूर भ्रमणध्वनी – ९८६०८३४८६१

लाल मातीने सारविलेल्या आमच्या घराच्या भिंतीवर पांढऱ्या चुन्याने काढलेली सुंदरशी नक्षी मन मोहून टाकीत होती. बाहेरच्या भिंतीही लालेलाल. संपूर्ण घराभोवती हिरवी, पोपटी, हिरवीकंच अशा अनेक हिरव्या छटांनी लपेटून घेतलेले वृक्ष, वेली, झुडपे, ताड, माड, आंबा, फणस, कोकम हे सर्व आपआपल्या जागी एखाद्या तपस्व्यासारखे शांतपणे उभे राहून लाल घराची शोभा वाढवीत होते. इथे निसर्गाची बरसात मुक्तपणे बरसत होती. ते आमचे कोकण व तेथील आमचे छोटेसे टुमदार घर.

आमच्या देशाचा, राष्ट्राचा, प्रदेशाचा, जिल्ह्याचा आणि गांवाचाही आम्हांला पुरेपूर अभिमान आहे. अभिमान वाटावे असेच इथे सारे कांही आहे. सह्याद्रीच्या उंच रांगा बघताना उंच मान करावी लागते म्हणजेच त्याची खूप मोठी योग्यता आहे. पायाखालचे जांभे दगड व लालमाती पाहताना मान खाली घालावी लागते म्हणजे नम्रतेने त्यांची आम्ही दखल घेतो. आजुबाजूची घनदाट झाडी पाहताना त्यांचे आकार, रंग, पाने, फुले हे पाहून भान हरपून दिलखुलास ओ हो! अरे वा! म्हणताना निसर्गाच्या किमयेला लवून अभिवादन करतो अगदी मनःपूर्वक. अनेक रंगांची पाने, फुले. त्यांचा आकार पाहून भान हरपून, मन मोहून जाते. गर्द–झाडीतील हिरवी, पिवळी, लाल, फुले पाहून त्यांना अलगद काढावेशी वाटतात पण ती आपल्या पासून खूप दूर उंचावर असतात. त्यामुळे नुसते बघण्यातच सुख मानावे लागते. त्याप्रमाणे गर्द झाडीतील हिरवे, पिवळे, निळे, लाल, तपकीरी एकाच रंगाचे नव्हे तर अनेक रंगांचे पक्षी त्यांचे मधूर, कर्कश, केविलवाणे आवाज ऐकून त्यांना आपल्या हातात घ्यावे असे वाटून धावावे तर ते आपल्याला चकवून लांब उडतात आणि वाकुल्या दाखवून परत तसेच आवाज काढून दाखवितात. असा निसर्गाने भरपूर नटलेला कोकण देऊन परमेश्वराने आमच्यावर खूप मोठी कृपा केली आहे. मग कोण म्हणतं आमचा कोकण दरिद्री आहे? ती तर सुंदर सोन्याची खाण आहे.

**आमचे कोकण (लालमाती)**

लग्न झाल्यावर जेव्हा आमच्या लालमातीच्या घरात मी प्रवेश केला तेव्हा हे सभोवतालचे निसर्गदृश्य पाहून आपण वेगळ्या स्वप्ननगरीत तर नाही नां आलो असेच वाटले. मग रोज चाळाच लागला. उगवता सूर्य, गुलबट, लालसर, आकाश, थंड वातावरण हे पाहून घ्यायचे. नंतर माध्यान्हीचे त्याचे तळपतेपण, तर सायंकाळी मावळतीचे निरोपाचे धूसरपण. जिवाला हुरहूर लावणारी कातरवेळ, माहेरच्या मायेची आठवण डोळे गाळणारी. त्यावेळी हिरवी वनश्री सुद्धा आमच्या दुःखात सामील होऊन मलूलपणे फिकट होते. पण परत सकाळी हसत्या उगवत्या सूर्याबरोबर फ्रेश होऊन मलाही फ्रेश करणारी. अशातच आमच्या प्रेमळ सासूबाईनी माझी हौसेने मंगळागौर केली. गौरीबरोबर मलाही उंची साडी दागदागिने घालून सजविले. शिवाय घरही वेगवेगळ्या फुलांच्या माळांनी, पानांच्या तोरणांनी सजले. सुंदर रांगोळ्यांनी अंगणाची शोभा वाढविली. सुग्रास भोजनांनी सगळेच तृप्त झाले. मग रात्रीचे सख्यांबरोबर खेळलेले खेळ–नुसता धुडगुस. पण तेव्हा घरच्या एका बाईला काम करावे लागत नव्हते. सासरहून आलेल्या माहेरवाशीणी आजुबाजूचे गोत, शेजार मैत्रिणी बहिणी, अनेक बाया बापड्या त्या प्रमाणे लहान मुलीही हौसेने फुले, पत्री काढण्याची मदत करावयाच्या. त्यामुळे तो सोहळा न राहता आनंदोत्सव होऊन जायचा. मग नागपंचमीही अशीच झोकात. सगळ्या मिळून वारुळाला जाणे, झोके घेणे, झोका वर खाली होताना फक्त त्यातील आनंदच घेणे. त्या त्या वयातील मजा मुक्तपणे घेणे हे ही भाग्यच असते. तेही मी घेतले. श्रावण महिन्याचा आनंद घेतल्यावर गौरी गणपतीचे वेध लागले. बरेच दिवस चालू असलेली साफसफाई. नंतर इतर तयारी करताकरता हरितालिका घरी येतेच. सुवासिनींच्या किलबिलाटांनी घर भरून जाते. मग साग्रसंगीत पूजा. आरती, कहाणी आणि सरते शेवटी नाव घेण्याची मजा. आजी पासून माजीपर्यंत सणसणीत उखाणे. मग दिलखुलास स्वच्छ हसणे. नंतर सगळ्या घरी जाऊन आपल्या कामात मग्न होतात. परत रात्रीचे जागरण करण्यासाठी सर्वजणींना एकत्र यावयाचे असते. रात्री फुगड्या, झिम्मा, कोंबडा, सूप असे अनेक खेळ. खेळून दमल्यावर भेंड्या. गाणी सुस्वरात नव्हेत तर अनेक सूर. पहाट कधी होत असे हे कळत ही नसे. मग एकच कामाची घाई उडे. अंघोळीसाठीही गर्दी. कारण बाप्पाचे स्वागत नटून थटून करावयाचे असल्याने आधी मी मी म्हणून झुंबड नंतर सगळे सज्ज होतात. मग बाप्पाचे आनंदाने स्वागत करतात. तेही हसून गृहप्रवेश करून आनंदाने विराजमान होतात.

दुसऱ्या दिवशी तृप्त मनाने पण थोड्याशा नाराजीनेच

त्यांची निघण्याची तयारी होते. आम्हांला खूप हुरहूर लागते. न कळत डोळे पाणावतात पण ओठ मात्र आवर्जून, पुढील वर्षीही आनंदाने लवकर या असेच म्हणत असतात. त्यानंतर नवरात्र. तोही थाट वेगळाच. नऊ दिवस घट बसतात. रोज देवीला जाणे. तिची वेगळी रूपे डोळ्यात साठवून ठेवणे, दसऱ्याचे नवीन हुरुपाने स्वागत करून नवीन वस्तूंची खरेदी करून साडेतीन मुहूर्त असल्याची जणू जाणीव ठेवणे. मग येते कोजागिरी चांदण्यारात्रीचे विलोभनीय दृश्य घेऊन. चंद्राजवळ आलेली रोहीणी. सारे डोळे दिपवीत असतानाच हातात येते मसाले दूध. बघता बघता दिवाळी येते माहेरची ओढ घेऊन पण सासरचे लक्ष्मी पूजन पार पाडून साग्रसंगीत पूजन करून नव्या दिवसाला, पाडव्याला माहेरी जायची घाई. माहेरी गेल्या गेल्या देवांच्या, मोठ्या माणसांच्या पाया पडून आईच्या कुशीत शिरून मुक्तपणे ढाळलेली आंसवे जणू मोत्यांची माळच पण फसवी. सासरची आठवणही येत असतेच. मग भाऊबीज भरपूर घेऊन सासरची वाट धरताना मुक्तपणे डोळ्यातून गंगा वाहात असतात सर्वांच्याच दुराव्याने पण जाणे अटळ असल्याने केवीलवाणे हसून पुढे जावे लागते.

काही दिवसांनी चक्कर येऊन पडणे. सासूबाई घाबऱ्या घुबऱ्या होतात. सासरेबुवा मटकन खालीच बसतात. पण चाणाक्ष सासूबाई अनुभवातून गेलेल्या असल्याने सर्वांना सावरत देवाला व माणसांनाही साखरेची चिमुट देतात. ह्याच आमच्या लाल मातीच्या घरात. मग सगळ्यांचे मला जपणे. खाण्यापिण्याचे लाड आणि चेष्टामस्करी. त्यातच हौसेने केलेले डोहाळजेवण. आमच्या निसर्गवाडीत खूपच धुमधडाक्यात. हिरव्या वनश्रीत मलाही हिरवी साडी नेसून वनदेवता केली होती. तर चांदण्या रात्रीतही डोहाळजेवण झाले. ती शोभा तर अवर्णनीय होती. सगळीकडे दुधाळ पांढरा प्रकाश, माझी चंदेरी साडी त्यावर रंगीत फुलांची वाडी. सगळा रंग बहार झाला होता. हसत, खेळत कार्यक्रम पार पडला होता. हौसेला मोल नसते हेच खरे. नंतर बाळराजाला येण्याची घाई. मी खूप मलूल झाले होते. आपल्याच घरात आपल्या बाळाचे आगमन होणार हा सासूबाईंचा प्रेमळ आग्रह त्यामुळे माझी आईही इकडेच आली होती. माझ्या वेदना सर्वांनाच जाणवत होत्या. डॉक्टरांपासून सर्वांचीच घाईगर्दी चालू होती. मऊभात, तूप लोणचे आग्रहाने खाऊ घातले होते. त्यातच लाईट गेली होती. सगळीकडे कंदील लावून ठेवले होते. त्यांचा प्रकाश वेगळाच वाटत होता. पण देवाजवळील मंदपणे तेवत असलेले निरांजन मात्र धीर देत होते. सर्वजण देवाला आळवीत होते. आणि देवदयेने सगळे ठीक झाले. पहाटेच्या निरव शांततेला बाळाने जागे केले. सुंदरसे गोरे गोमटे बाळ जन्माला आले. कुणाचाच आनंद गगनात मावत नव्हता. एका मोठ्या मुलाची माता, एका पहिलटकरणीची माता आणि एका नवजात अर्भकाला जन्म दिलेली माता ह्या चेहेऱ्यावर समाधानाचे तेज, आनंदाचे तेज निरांजनाच्या मंद उजेडात सुवर्णासारखे तळपळत होते. सगळ्यांना सार्थक झाल्यासारखे वाटत होते. हा सोहळासुद्धा आमच्या छोट्याशा पण टुमदार आणि आनंदी घरात झाल्याने घराला सर्ववृक्षवेलींना ही खूप आनंद झाल्याने तेही खंबीरपणे उभे राहून समाधानाने पण मंदपणे डुलत होते. काही दिवसांनी एक नवा पाहूणा त्यांच्यात बागडणार होता.

आमच्या इथले अमृतफळ आंबा अनेक आकार. छोटे मोठे गोलसर, लांबट, कोयरीसारखे पण सर्वांतील गोडी अवीट अमृतालाही लाजविणारी. त्यांचे रंग, आकार बघुनच विश्वकर्माचे कौतुक करावेसे वाटते. लालसर, पिवळे, शेंदरी, हिरवट, पिवळे हे रंग पाहून त्याची बोटे आपल्यालाही लाभली तर आपणही आगळी वेगळी अमोल कलाकृती निर्माण करू शकू, असे मनापासून वाटते. पण ते मनातच जपून ठेवायला हवे नाही तर हसू होईल. आंब्याप्रमाणे इथले ताडगोळेही मधूर चवीचे. आतून पांढरट तर बाहेरून फिकट पिवळसर. सोलताना हातातून पटकन उडी मारून पळतात चपळाईने. त्यांना सावरताना आपली त्रेधातिरपीट होते पण पकड घट्ट करून त्यांना आपण पटकन तोंडात टाकतो तेव्हा मात्र आपलाच चेहरा आनंदित होतो ते फळ खाताना. माड – मानवर करून त्याला जणू आपण नमनच करतो. तो तर कल्पवृक्ष. खूप खटाटोप करून सोलून आतील पाणी पितो ह्याच शहाळ्यातले. शिवाय मृदु मुलायम सायीसारखे खोबरे खातो. पण त्यांना इजा होऊ नये म्हणून एकच चावा घेऊन पटकन गिळून टाकतो कारण त्यांना दुखवावेसे वाटत नाही. फणस – वरून काटेरी असणारा फणस हा इथल्या माणसांचेच जणू प्रतीक आहे. ही माणसे जरी फटकळ असली तरी आतून तेवढीच प्रेमळ, मायाळू मदतीला धावून येणारी, वेळ निभावून नेणारी. फणसाचा सुमधूर वासही मोहित करतो. त्याचेही वेगळे पदार्थ, पोळी, तळलेले गरे हे खाण्यातही वेगळीच गोडी असते. आंबा, फणस ह्यांचा मोसम संपला तरी त्यांचे करून ठेवलेले पदार्थ मात्र बाराही महिने खाऊ शकतो चवीने खाण्यातली त्याची मजा वेगळीच असते. कोकमाच्या रंगानेच आपण आकर्षित होतो. त्यांचे रंगीत सरबत मनमोहून टाकते. आणि तोंडाला पाणी सुटते. शिवाय ते आरोग्यदायकही असते. कोकम वाळवून आपण आमसुले मिळवू शकतो. त्यानंतर पपणसही आपण पाहून खूश होतो. मोठे आकार, सुरेख रंग,

वेगळी चव. तर अशी खावीतेवढी बरीच वेगवेगळी फळे. फळाफुलांबरोबर औषधी वनस्पतीही भरपुर. अशा वृक्षवेलींनी नटलेल्या कोकणची तरफदारी करावी तेवढी कमीच आहे. भरपूर पाऊस पडला की आनंदित शेतकरी शेतात भाताच्या कामाला लागतात. पावसात चिखलात मेहनत केल्यानंतर भरभरून भाताच्या लोंब्या दिसल्या की त्यांच्या आनंदाला सीमा नसते. मेहनतीचे फळ त्याच्या पदरात पडते. पण कधी पावसाने दडी मारली किंवा पाऊस कमी झाला तर त्यांच्या तोंडचे पाणी पळते. नद्या नाले आटतात. पाणी पाणी करून प्राण कंठाशी येतात. पीक कमी म्हणजे गरीबीत भर. कशीबशी पेज खाऊन अर्धपोटी राहून दिवस कंठावे लागतात. तरीही बिचारा पुढील वर्षी एखाद्या पावसाच्या सरीने आनंदीत होऊन शेतात कामाला लागतो. आणि देवाला आळवीत राहतो बाबा पाऊस चांगला पडू दे. पण खूप पडून ओला दुष्काळही पाडू नको. त्याच्या मनासारखे झाले की सगळे घरदार आनंदाने नाचू लागते. इथल्या माणसांचे अनेक प्रकार - प्रेमळपणा, भावना प्रधान, मायाळू, मदतीची तत्परता. त्याच प्रमाणे भाऊबंदकी, हेवेदावे, अगदी वाटोळे होण्यासाठी देवदेवस्की, करण्या करणे, कौल लावणे, लिंबा, भाताचे उतारे काढणे हेही प्रकार केले जातात. पण सणावाराला मुंबईहून आलेल्या सग्या सोयऱ्यांचे आगत स्वागतही मोठ्या मनाने केले जाते. गौरी-गणपती व होळीला आलेल्या मुलांसोबत रिण काढून सण साजरे होतात आनंदी वातावरणात. मग ते संपवून मुलगे जेव्हा जायला निघतात तेव्हा डोळ्यातल्या सरी थांबतच नसल्याने पुढे ही कितीतरी दिवस त्यांच्या आठवणींने त्या कोसळत राहतात. अशी ही प्रेमळ माणसे- ह्या माणसांत, वातावरणात आम्ही तरुणाचे वयस्कर झालो आणि बघता बघता एक दिवस ह्या सुंदर वातावरणाला, घराला माणसांनाही पारखे होणार. पण एका नव्या वेगळ्या जगात प्रवेश करणार. व तिथेच आम्ही बाकीच्यांची वाट बघत रहाणार नव्या गप्पा मारण्यासाठी.

❖

# प्रेमस्वरूप आई



**मा**झ्या आईचे नाव मालती मराठे आहे. आम्ही सात भावंडं, तीन भाऊ, चार बहिणी. आमच्या कुटुंबाचं मध्यमवर्गीय रहाणीमान, वडील नोकरी करत व आई गृहिणी आहे. घरी आजी होती. आमच्या घरात सतत येणाऱ्या-जाणाऱ्या पाहुण्यांचा राबता होताचं. माझी आई खूप कष्टाळू व धार्मिक प्रवृत्तीची आहे. कल्याणासाठी पूजाअर्चा व पोथी वाचन ती नियमीतपणे करते. संसाराचा खर्च आटोक्यात रहावा म्हणून डाळी, मीठ, मसाले, भाजणी, मेतकूट व मिरची पूड अशा वर्षाला लागणाऱ्या वस्तू ती जाते व उखळ यांचा वापर करून घरीच बनवत असे. या कामात तिला आम्ही भावंडं मदत करत असू.

आई असा शब्द उच्चारला की, तिची माया व वात्सल्य आठवून डोळे पाणवतात. आई हे आयुष्यात मिळालेलं लेणं आहे. आईने आमच्यासाठी अतोनात कष्ट केले. सूर्योदयापूर्वी उठून ती आमचे सगळ्यांचे शाळा-कॉलेजला जाण्यापूर्वी डबे करून द्यायची. मुलांचे अभ्यास व परीक्षांची तयारीदेखील आई करून घ्यायची. मधल्यावेळेत शेवया, मसाले असे घरगुती पदार्थ बनवायची. आमची आजारपणं म्हणजे तिने रात्र-दिवस केलेली जागरण आजही आठवतात. तिने आमच्यावर केलेल्या संस्कारांची शिदोरीच आमचे जीवन सुखी, आनंदी व यशस्वी होण्यास उपयोगी पडली आणि जन्मभर पुरेल इतकी आहे. त्याबद्दल आम्ही तिचे सदैव ऋणी आहोत. तिचे आशीर्वाद सदैव आमच्या पाठीशी आहेत.

आई शांत स्वभावाची असल्याने आमच्या हातून चुका झाल्या तरी तिने कधी राग बाळगला नाही. ती आम्हाला समजून घेई. मुलं-मुली, नातवंडे यांची ती सदैव आस्थेने चौकशी करीत असते. गोरगरिबांना मदत करण्यासाठी ती सदैव तत्पर असते. शेजारी पाजाऱ्यांनाही तिने वेळोवेळी अमूल्य मदत केली आहे. ही आमची प्रेम स्वरूप व वास्तल्य सिंधू आई सांगली येथे आमच्या घरी आहे. येत्या ८ मार्चला तिला शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. तो दिवस आनंद सोहळा आम्ही भावंडे आनंदाने साजरा करणार आहोत.

- **श्री. मनोहर गोविंद मराठे**, बोरिवली
दूरध्वनी - २८०१५१२५
भ्रमणध्वनी - ९८९२५९१६६३

# नक्की काय!

• **जयंत र. मराठे** (पृ. ५१०), पुणे भ्रमणध्वनी – ९०९६०८३९५२

दिवाळी येणार याची चाहूल नवरात्राच्या पहिल्या दिवसापासूनच लागते. कारण दसऱ्या नंतर तीन आठवड्यानी दिवाळी सुरू होते. दिवाळीचे वर्णन करताना हा दिव्यांचा सण 'Festival of Lights' असे म्हटले जाते. तर काही जण हा तर 'दिवाळ खोरीचा' सण असे विनोदाने म्हणतात. चाकरमाने, नोकरदार अगदी भांडी घासणाऱ्या पासून ते सफाई कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने दिवाळी हा 'बोनस'चा सण आहे. बोनस म्हणजे पगारा व्यतिरीक्त मिळणारे वेतन त्यामुळे या पैशांतून दिवीळीची महागडी खरेदी होते.

वृत्तपत्रे व मासिकांना दिवाळी म्हणजे पैसे कमाविण्याची एक आगळी वेगळी संधी. भरपूर जाहिराती आणि भरपूर खप त्यामुळे त्यांचा आनंद वेगळाच. सध्या टीव्हीवाल्यांना म्हणजेच त्यातील चॅनेल्सना दिवाळी म्हणजे जाहिरातींचा पाऊस. कोणताही रटाळ कार्यक्रम करमणूक म्हणून लोक पहातात. आणि मग या जाहिराती पहाव्याच लागतात आणि मग त्यातून कोणता साबण, कोणती पावडर, कोणता हेअर कलर किंवा शांपू, वा क्रिम यांची निवड होते टीव्ही वाले कमावतात, जाहिरातदार कमावतात पण पहाणारे पैसे गमावतात.

पण यंदा मला एक वेगळाच अनुभव येतोय. साधारणपणे अनंत चतुर्थी पर्यंत 'मान्सून धमाका'. मान्सून सेल या नावाखाली सगळ्या कपड्यांच्या दुकानांतून, साड्यांच्या दुकानांतून 'डिस्काऊंट' सेल चालू असतात. इतर इलेक्ट्रॉनिक वस्तुंचाही काही प्रमाणात हा सेल चालू असतो. याचे कारण ऑन लाईन विक्री स्पर्धा. म्हणजे ॲमेझान, स्नॅपडील, फ्लिपकार्ट या ऑनलाईन ऑर्डरद्वारे शूज म्हणजे पादत्राणापासून अगदी एलइडी टीव्हीपर्यंत आणि काही तर औषधे सुद्धा तुमच्या दरवाजाच्या पर्यंत येऊन तुमच्या हातात हा माल देतात आणि तो सुद्धा दुकानांतील किंमती पेक्षा स्वस्त. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वस्तू घरात आणि तेव्हाच पैसे (किंमत) कुरीअर वाल्याच्या हातात. विक्रीच्या या नवीन तंत्रामुळे मोठ मोठे मॉल्स, घाऊक विक्रेते, अधिकृत विक्रेते या सर्वांचे धाबे दणाणले आहेत.

या 'ऑनलाईन' विक्रीचे काही आकडे व आकडेवारी फार चक्रावणारी आहे. फ्लिपकार्ट म्हणते आम्ही प्रत्येक सेकंदाला २९ वस्तू विकल्या. (१६/१०/१५ ची बातमी). आमच्या जाहिरातीतील तारखांना, पहिल्या १० तासात १० लाख प्रॉडक्टस् (उत्पादने) विकली आणि आमच्या साईटला (वेबसाइटला) संपर्क यंत्रणेशी ६ मिलियन म्हणजे ६० लाख लोकांनी संपर्क साधला किंवा भेट दिली, असे फ्लिपकार्ट म्हणतात.

आता 'स्नॅपडील' या ऑनलाईन' क्षेत्रातील दुसऱ्या कंपनीचा दावा आहे की सोमवारी आम्ही प्रत्येक सेकंदाला ५ मोबाईल विकले. आणि एकूण विक्री १०० दशलक्ष डॉलर्स झाली.

याच क्षेत्रातील 'ॲमेझॉन' या तिसऱ्या कंपनीचे म्हणणे आहे की 'सेल'चा (ऑफर वाला) पहिला दिवस Biggest Day होता. पहिल्या दिवशी ४ पट विक्री झाली. २० दशलक्ष लोकांनी संपर्क साधला. आणि 'फॅशन मटेरिअल/वस्त्र प्रावरणे यांची विक्रमी विक्री झाली.

वरील तीनही बातम्या ही सुरुवात आहे. वर्षातील सर्व राष्ट्रीय सुट्ट्या व सणवार यांच्या लगतच्या दिवसात असे सेल लागून निरनिराळ्या डिस्काऊंटस, गिफ्टस, ऑफर्स यांचा अक्षरशः पाऊस पडतो हे स्पष्टच दिसतंय. पण या कंपन्यांना २५ टक्के पासून ते ७० टक्के तर कधी कधी ८० टक्के डिस्काऊंट परवडतात कसे हा प्रश्न येतो. यामध्ये प्रामुख्याने इलेक्ट्रॉनिक उत्पादने व तयार वस्त्रांचा समावेश आहे तरी पण मूळ उत्पादकाकडून वस्तू खरेदी करणे त्यांची मिडियावर (प्रिंट व इलेक्ट्रॉनिक म्हणजे चॅनल वरील जाहिराती) सातत्याने जाहिरात करणे व पुनः कोरिअर मार्फत ती वस्तू किंवा उत्पादन खरेदीदाराच्या हातात ५ ते ७ दिवसांत (एरवी २ ते ३ दिवस) सुपुर्द करणे या साठी यंत्रणा उभी करणे या सर्वांसाठी येणारा खर्च करून पुनः नफा कमावायचा तर मूळ वस्तूची नक्की किंमत (म्हणजे विक्री किंमत नव्हे) उत्पादन खर्च किंवा निर्मिती खर्च काय असेल असा प्रश्न पडतो. म्हणजे एरवी ग्राहकाची किती 'लूट' होते आणि त्याचा फायदा कोणला मिळतो? उत्पादकाला, विक्रेत्याला की स्टॉकिस्टला नक्की कोणाला मिळतो!

काही मोठ्या बांधकाम व्यावसायिकांच्या जाहिरातीही नवरात्रापासून सुरू होतात. प्रथम येणाऱ्या २५ कधी कधी १०० ग्राहकांना आकर्षक भेटी उदा. कारस् डायमंड सेटस् लार्ज एलईडी टीव्ही सेटस् किंवा अमूक अमूक लाखांची सूट

मिळेल. प्रोसेसिंग फी, स्टँप ड्यूटी सुद्धा नसते. कधी कधी हफ्ता सुद्धा पझेशन नंतर तर कधी भाडे देण्याचे अमिष. मग प्रश्न पडतो स्क्वेअर फूट (१' x १') म्हणजे मी उभा आहे त्या एका चौरस फूटावरील १६ ते १७ मजल्या गणिक नक्की बांधकाम किंमत काय?

सामान्य माणूस या 'नक्की काय' या प्रश्नाचे उत्तर शोधत नाही. कारण तो तूर डाळ रु. २००/- वरुन रु.१८०/- झाली म्हणजे २० रु. वाचले व कांद्याचे भाव पुनः वाढले या विवंचनेत दिवाळीचा बोनस नक्की मिळेल व हे सर्व निभावून नेऊ अशा विचारात असतो. ❖

# वाचकांचा पत्रव्यवहार

## सांगली कुलसंमेलनात सादर केलेली ही कविता

भेटलो आज सारे आपण
करण्या मजा मस्ती
विचारांची देवाण घेवाण
आणि खूप सारी मैत्री।।
कोण कुठले नव्हते ठाऊक
आलो एका छताखाली
नात्यांची खूण गाठही
आज झाली पक्की।।
ऋणानुबंध हे कधीचे
माहित नाहीत कोणा
आजी दादा काका ताई
अशी नवी नाती आज मिळाली आम्हा।।

## संमेलनाहून परतल्यावरच्या माझ्या भावना कवितेद्वारे मी व्यक्त केल्या

जमले सारे मराठे
त्यांतीलच मी एक खांबेटे
निमित्त होते अखिल भारतीय मराठे संमेलनाचे
सांगलीकरांनी आयोजन केले त्याचे।।
साथीदारांचा उत्तम मेळ
जूळवून आणला भूषण, 'सूयोगा'ने
शास्त्रीय, नाट्य, भाव भक्तीत
रंगून गेले सारे।।
काव्य वाचन, सांस्कृतिक दर्शन
प्रवास वर्णन, तर व्याडेश्वराचे शाब्दिक दर्शन
ब्रिगेडीयर आणि रमाकांत काकांची अर्थपूर्ण माहिती
तर पन्नाशीनंतरची अर्थार्जनाची महती।।
खूप साऱ्या गप्पा, खूप मजामस्ती
सांगलीकरांनी दिली भोजनाची मेजवानी
परतीच्या प्रवासात एकमेकांची काळजी
प्रेमाची आपुलकीची मिळाली मोठी शिदोरी।।

**– संध्या खाबेटे** (पृ.क्र. ६९६)
६०१, बंगश्री टॉवर, दाजी रामचंद्र रोड,
चरई, ठाणे ४००६०१
दि.०४-०२-२०१६
मोबा. : ९८६७०७२२४६

सु वि चा र

**ज्ञान म्हणजे योग्य उत्तर माहीत असणे**
**बुद्धिमता म्हणजे योग्य प्रश्न विचारणे**

सु वि चा र

डॉ. सौ. सुमेधाताई
संपादिका 'हितगुज' यांस

स.न.वि.वि.

सप्टेंबर २०१५चा अंक नुकताच मिळाला. विविध विषयांवरील लेखांमुळे अंक वाचनीय आहे. त्याबद्दल धन्यवाद विनायक केशव (व्ही.के.) व लक्ष्मण शंकर यांच्या दुःखद निधनाचे वृत्त वाचून वाईट वाटले. त्या दोघांच्या घरी मी गेलो होतो. दोघेही आदरातिथ्यशील व प्रेमळ होते. कळकळीचे कार्यकर्ते सोडून गेल्यामुळे अतिव दुःख झाले.

नवीन २०१६ वर्षासाठी कपि गोत्री मराठे परिवाराला शुभेच्छा.

**चिं. त्र्यं. मराठे** (पृ.क्र. २४८), कळवा
भ्रमणध्वनी : ९८६७९३१३५७

# श्री व्याडेश्वर महात्म्य

• **सौ. मेधा विठ्ठल मराठे** (पृ. २३५), सांगली दूरध्वनी - ०२३३-२३०००७२

आपल्या सर्वांचे कुलदैवत गुहागर येथील श्री वाडेश्वर! त्याच्याबद्दलची सविस्तर माहिती फार थोड्या लोकांना असेल. ती माहिती विश्वनाथ कवी यांच्या ''वाडेश्वर महात्म्य'' या संस्कृत काव्यात उपलब्ध आहे. हे विश्वनाथ कवी कौशिक गोत्री असून गुहागर निवासी होते. त्यांचे पूर्ण नाव विश्वनाथ महादेव पित्रे असे होते. त्यांनी हे काव्य इ. स. १६३७ साली लिहिले. काव्याचे एकमेव हस्तलिखित कलकत्त्याच्या एशियाटीक सोसायटीमध्ये आहे. वाडेश्वरोदय या संस्कृत काव्याचा मराठी अनुवाद मो. दि. पराडकर यांनी केला व तो रघुनाथ हरी आपटे यांनी महाशिवरात्र, ४ मार्च १९८१ रोजी प्रसिद्ध केला.

या ग्रंथाचे १४ सर्ग असून त्यातील सर्व श्लोकांची संख्या ६९४ आहे. या काव्यात गुहागर येथे वाडेश्वर या महाराष्ट्रातील चितपावन ब्राह्मणांच्या कुलदैवताच्या स्थापनेचे व नंतर गुहागर गांव मंदीर रचनेचे वर्णन आले आहे.

ज्याचा पिता जमदग्नी ब्राह्मण व माता रेणुका क्षत्रिय होती अशा जन्म दात्यांच्या पोटी परशुरामाने जन्म घेतला. त्याने २१ वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय केली. क्षत्रियांच्या हत्येचे पाप घडले त्याच्या क्षालनार्थ त्याने मुनिश्री काश्यपाला पृथ्वीचे दान केले. दान केलेल्या भागावर आपण राहणे योग्य नाही. त्यामुळे माझा आश्रम पृथ्वीच्या पृष्ठभागावर कोठेही नसावा. तो नदीपती समुद्राच्या अंतर्गत असावा व ते रास्त आहे असे त्याला वाटले सागरांतर्गत पुण्य भूमीचा शोध घेत घेत अनेक देश ओलांडून सह्य नावाच्या कुलपर्वतावर तो आला. तेथे समुद्राच्या उसळणाऱ्या उत्तुंग लाटा पर्वताच्या पायथ्याचे प्रक्षालन करीत होत्या. त्या समुद्राकडे याचक होऊन त्याने भूमी मागितली. ती समुद्राने दिली नाही म्हणून आपल्या अमोघ बाणाने समुद्र हटवून भूमी निर्माण केली. त्याने सह्य पर्वतावर आपल्या आश्रमासाठी समतल जागा पाहिली. तिचे साम्य पूर्वी रहात असलेल्या महेंद्र पर्वताशी असल्यामुळे त्या सह्य पर्वताला महेंद्र हेच नाव दिले आणि आपल्या गुरूस्वरूप गिरीश शंकराची उपासना करीत तो तेथे राहिला. परशुरामाच्या वास्तव्याने भगवान शंकरही तेथेच निवास करू लागले. ज्या ठिकाणी विश्वात्मा शंकर निवास करतो ते सुंदर, पुण्यकारक अरण्य असलेले, सागर सन्निध भृगुपती परशुरामाचे आवडते, अनेक गुणानी समन्वीत असलेले, पाप निर्दालनासाठी निर्माण झालेले, गुहाभिद नावाचे क्षेत्र निर्माण झाले. शंकराच्या आगमनाने समाधान पावलेल्या परशुरामाने आपण निर्माण केलेल्या भूमीला निरनिराळ्या रचनांनी सजवले. रामतीर्थ व वरूणास्त्राने बाणगंगा तीर्थ निर्माण केले. पुण्यकारक अशा तीर्थामुळे तिथे अनेक ऋषी येऊन राहू लागले. शंकराच्या दर्शनाच्या अभिलाषेने व्याड मुनिने आश्रमातील गुहेत वास्तव्य केले. त्यानी योग्य ठिकाणी लिंग स्थापन करून रोज तीर्थाचा अभिषेक सुरू केला.

एकदा परशुराम कावेरी नदीवर गेले असताना त्यांना पयोष्णी नदीच्या तीरावर जन्मलेले वेदांत पारंगत असे पुण्यवान साठ ब्राह्मण आपली घरे सोडून प्रवास करून आलेले दिसले. त्याना आपल्या पवित्र भूमीची माहिती देऊन त्यांच्या चरितार्थाची व रक्षणाची जबाबदारी घेऊन त्याची समजूत काढली व आपल्या भूमीत आणून त्यांच्या निवासाची सोय केली व त्या आकर्षक नगराला चितपावन नाव दिले म्हणून तेथे राहणारे ते सर्व ब्राह्मण चितपावन गणले गेले.

नंतर कालगणतीनुसार कली अवतीर्ण झाल्याचे जाणून त्या क्षेत्रातील राहणाऱ्या सर्व मुनीनी आपापल्या घरांत देवांची स्थापना करून आपला देह नदीत समर्पित केला. ज्या ज्या मुनिने जो जो देव स्वत:च्या घरात स्थापन केला त्या त्या मुनिच्या नांवाने तो तो देव परशुरामाच्या भूमीवर प्रसिद्ध झाला.

परशुरामाच्या भूमीच्या मध्यवर्ती विशाल असा मुख्य भाग ''गूढ'' या नावाने ओळखला जायचा. तेथे ''सांकुराण'' नावाचा वीर राजा रहात होता त्याच्या घोड्याच्या तबेल्याशेजारी बांबूच्या बेटात ''वाडेशाचा'' निवास होता. घोड्याच्या शिंगराना दूध पाजण्यासाठी गायी ठेवल्या होत्या. त्या गायीमधील कामधेनुच्या वंशातली तांबूस गाय रोज वाडेश्वरावर कासेच्या दूधाचा अभिषेक करीत असे. त्यामुळे तिचे दूध शिंगरांना मिळत नसे. त्यामुळे तबेल्यातील अधिकाऱ्याने गुराख्यावर तू दूध पितोस असा आरोप केला.

गुराख्याने गायीवर लक्ष ठेवून ती बांबूंच्या बेटात जाऊन एका शिळेवर दुधाचा अभिषेक करताना पाहिले. तेव्हा त्याने रागाने गायीला काठीने मारले व त्या शिळेवरही काठीचा प्रहार केला. तेव्हा त्या शिळेतून रक्त आले. ही गोष्ट तबेल्याच्या अधिकाऱ्याने राजाला सांगितली. तेथे सांडलेले रक्त राजाने पाहिले. ते बघून तोही स्तिमित झाला. त्याने सेवकाना चारी बाजूने खणण्यास सांगितले. तेव्हा काही ठिकाणी पातळ तर काही ठिकाणी जाड व काही ठिकाणी समांतर असे लिंग दृष्टीस पडले. त्याच लिंगावर त्याने प्रासाद तुल्य मंदीर बांधले. मंदिराच्या बांधकामात मूल्यवान अशा लाकडाचा वापर केला. मंदिराला देवड्या, तोरण, द्वारे, तुळ्या व मोठेखांब बसविले. नाना चित्रानी आकर्षक व विशिष्ठ कारागीरांच्या कौशल्याने नटवले. त्याचा गाभारा अत्यंत विशाल अशा शिलाखंडानी बनवला. त्याच्यासमोर मुखशाला बांधली. मंदिराच्या प्रासादाच्या बाजूला तटबंदी बांधून चंडेश व नंदिकेश यांची योग्य ठिकाणी स्थापना केली. मंदिराच्या पूर्वेला क्रमाने हनुमान, सूर्य, विष्णू, यांच्यासह महिषासूर मर्दिनीची त्याने स्थापना केली. वाडेशाच्या भक्तानी मौल्यवान वस्तू व देणग्या दिल्या. देवाची प्रात:काळी, माध्यानी व रात्री अशा तीन वेळा धुपारती सुरू केली.

हा बहुरूपी व सर्वसाक्षी वाडेश्वर परशुरामाला सदैव निजरूपात प्रत्यक्ष व इतरांसाठी लिंगरूपात दिसतो. पुढे राजाच्या अनुमतीने श्रीमंत व विद्वान अशा श्रीधर नावाच्या ब्राह्मणाने व्यवस्थित आखणी करून गुहागर ग्राम वसविले. व्याड मुनिंचा मंडळाकार आश्रम येथे असावा. त्यानी या ठिकाणी लिंग स्थापले असावे असे राजाच्या ऐकीवात होते म्हणून त्याला वाडेश्वर या नावाने ओळखले जावे असे तो म्हणाला.

ज्या गावात भुक्तीप्रद वाडेश आहे, ज्यात मुक्ती देणारा रामेश आहे, विजयदात्री दुर्गा विद्यमान आहे, आर्तिनाशन जरामठही आहे, ज्या क्षेत्रात पांच नारायण आहेत व ज्या ठिकाणी तीर्थाचा आश्रय असा सागर आहे ते हे गुहग्राम (गुहागर) नावाचे क्षेत्र पाप विनाशक आहे.

❖

## एक अनुभव

### (घामाचा पैसा फुकट जात नाही)

मी व माझी पत्नी बडोदा मुंबई फ्लाईटने २३ ता. (२३-१२-२०१५) सकाळी ९ वाजता छत्रपति शिवाजी विमानतळावर उतरून प्रीपेड टॅक्सी काऊंटरवर उभे होतो. बोरीवली वेस्ट डॉन बॉस्को स्कूल विस्तारांत जाण्यासाठी रु. ४०५+३० असे शुल्क सांगितल्यावर मी १०३५/- दिले व मला ६००/- परत मिळण्याऐवजी १००/- परत मिळाले व ती नोट मी खिशात ठेऊन टॅक्सी येईपर्यंत काऊंटरवर उभे होतो. पैसे भरल्याची स्लीप टॅक्सी नं. सह मिळाली व टॅक्सीत बसून अंधेरीपर्यंत आल्यावर हिला म्हणालो, मला प्रीपेड टॅक्सी काऊंटरवर फक्त १००/- च परत मिळाले ५०० मिळाले नाहीत. ही म्हणाली, परत जायचे का मी म्हटले नको, म्हटलं मुंबईत उतरल्यावर पहिलाच फटका पडला. हातात प्रीपेड टॅक्सी काऊंटरवरून मिळालेली रिसीट वाचताना कंझ्युमर सर्व्हीस नंबर दिसला. स्लीपवर काऊंटर नंबर तसेच क्लार्क कॅशीयरचे नाव होते. मी माझे बोबाईलवरून डीटेलमध्ये एसएमएस केल्यावर मला उत्तर आले किती पैसे घ्यायचे राहिले. मी उत्तर पाठविले १०३५-४३५=६०० पण मिळाले १०० म्हणजे ५०० बाकी. समोरून पुन्हा फोन आला परत कधी जाणार मी म्हटले, मी माझा बँकेचा सेविंग खाते नं. कळवितो. कोर बँकिंगने माझे खात्यात ५००/- भरा. समोरून हो म्हटल्यावर मी निश्चिंत झालो. थोड्यावेळाने फोन आला. काही कारणास्तव पैसे आज जमा होणार नाही पण २८/१२ रोजी जमा होतील. मी म्हटले ठीक आहे. पण तेवढ्यात समोरून विचारले गेले की, मोबाईलमध्ये ५०० रुपयाची रिचार्ज केला तर चालेल का? मी हो म्हटले. अर्ध्या तासात रु. ५००/- माझ्या प्रीपेड मोबाईलमध्ये जमा झाले. मी काऊंटरच्या क्लार्कला मोबाईलवर धन्यवाद दिले.

– **श्री मोहन मराठे** (पृ. क्र. ४२२)
समर्थ शियापुरा, रावपुरा बडोदे ३९०००१
मोबा. : ९८२५०५५७७१

# नातवंडांच्या साक्षीने रंगला आजी-आजोबांच्या लग्नाच्या ५०व्या वाढदिवसाचा सोहळा

• **सौ. स्मिता संजय कोलटकर** (पृ. ७३२), भांडूप भ्रमणध्वनी - ९८६७१३३६७९

निवृत्त तुरूंग अधीक्षक श्री. अच्युत महादेव चक्रदेव व सौ. शालिनी अच्युत चक्रदेव यांच्या लग्नाचा ५० वा वाढदिवस २४ डिसेंबर २०१५ रोजी चिंचवड येथील 'अक्षय हॉल' मध्ये मुले-नातवंडे, स्नेही आप्तजनांच्या सहवासात साजरा झाला.

सौ. शालिनी अ. चक्रदेव या माहेरच्या सांगलीतील, पाटणकर कुटुंबातील. घरातीलच उत्साही गायक-गायिकांनी विविध गाण्यांतून सुरेलपणे चक्रदेव व पाटणकर या दोन्ही कुटुंबांची ओळख करून दिली. नंतर गायनाच्या माध्यमातूनच 'मुलगी पाहणे ते विवाहसोहळा' हा प्रवास साकारला. शेवटी 'क्षण आला भाग्याचा' या गाण्याच्या ओळींवर आजीने पुनश्च आजोबांच्या गळ्यात वरमाला घातली.

५० वर्षांच्या आठवणी जागविण्यासाठी दोघांनाही 'तुरूंग अधिकारी' म्हणून काम करता करता ज्या ज्या गावी बदल्या झाल्या तेथील अनुभव सांगण्यास सांगितले. गावांच्या नावाच्या चिठ्ठ्या उचलून दोघांनीही त्यांना पटकन आठवणारे प्रसंग सांगितले. आणि ते प्रसंग ऐकता ऐकता सगळेच जण आठवणीत रममाण झाले.

दत्तजयंतीचे औचित्य साधून 'दत्त भजनेही' सादर झाली. वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या जेष्ठांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. अच्युत महादेव चक्रदेव यांचे अभिष्टचिंतन. त्यांना आरोग्यसंपन्न दीर्घायूष्य लाभो ही शुभेच्छा.

(सौ. स्मिता कोलटकर या अच्युत चक्रदेव यांच्या सुकन्या आहेत) मराठ्यांच्या माहेरवाशीण आहेत.

❖

---

## सहवेदना — श्री. प्रभाकर दत्तात्रेय मराठे यांचे निधन

माझे थोरले बंधू श्री. प्रभाकर दत्तात्रय मराठे (वय ७५) यांचे, त्यांच्या राहत्या घरी, चिंचवड येथे दुःखद निधन झाले.

सुमारे २०/२२ वर्षांपूर्वी ते स्वतः आपल्या 'मराठे कुलवृत्ताच्या' मराठे प्रतिष्ठानच्या कामात कार्यरत होते. पिंपरी-चिंचवड परीसरातील 'अनेक मराठे' कुटुंबियांना सभासद करून घेण्यात त्यांचा सहभाग होता. प्रसिद्ध लेखक व प्रतिथयश 'ज्योतिषी' म्हणून ही त्यांची ओळख होती.

३० कादंबऱ्या, २ कथासंग्रहासह ऐतिहासिक पुस्तके व ज्योतिष आणि आरोग्य विषयक शब्दकोश ही त्यांची 'साहित्य संपदा' होती. अनेक सामाजिक, ललीत आणि प्रबोधन पर लेखासाठी व कथांसाठी पुरस्कार ही प्राप्त होते शिवाय २००च्या वर कविता ही त्यांनी लिहील्या होत्या. 'नेत्रदान', मोफत ज्योतिष वर्ग व 'वरदायीनी' नावाचे वधू-वर सुचक मंडळ ते चालवित असत. अनेकांना 'मराठी-साहित्य' मार्गदर्शक म्हणून ही त्यांनी मदतीचा हात दिला होता. 'हितगुज' मासिकातही त्यांचा परिचय लेख विस्तृतपणे प्रकाशित झाला होता. त्यात त्यांची ग्रंथसंपदाही अुल्लेखित केली होती.

आपला

**श्री. सुधाकर दत्तात्रेय तथा बाळ मराठे**
९८२२३२९७७०
बी १/७ अष्टविनायक सो.,
६७२/३, बिबवेवाडी, पुणे ४११०३७
फोन - ०२०-२४२१०१९८

**मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. प्रभाकर दत्तात्रेय मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**

# आठवणी दाटतात!

• **ॲड. सौ. प्राची स. भिडे,** रोहा-रायगड भ्रमणध्वनी - ९७६६४४७९४०

**या देवी सर्वभुतेषु मातृरूपेण संस्थिता।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।**

असे जिचे वर्णन करता येईल ती माझी आई श्रीमती भारती केशव भातखंडे ही दि. ३/०३/२०१५ रोजी कल्याण येथे देवाघरी गेली. माझी आई पूर्वाश्रमीची कु. कमल त्र्यंबक भिडे म्हणजे भिड्यांची माहेरवाशिण. भिडे कुलवृत्तांतात श्री. बाळकृष्ण भिडे व श्रीहरी भिडे या गुणी बंधूंची विशेष ओळख करून दिली आहे. त्यांची मोठी गुणी बहीण म्हणजे माझी आई.

माझ्या आईचे माहेर ठाण्याचे. वयाच्या २०व्या वर्षी तिचे लग्न कल्याणचे सुविद्य श्री. केशव वामन भातखंडे यांच्याशी झाले. श्री. भातखंडे यांचा जन्म धार्मिक घराण्यात झाला व त्यांना स्वतःलाही अध्यात्माची आवड होती. वैकुंठवासी ह.भ.प. मामासाहेब दांडेकर त्यांचे गुरू होते. अतिशय लहान वयातच ते अभ्यासपूर्ण कीर्तने, प्रवचने आवडीने करत होते. वास्तविक त्यांना कल्याणलाही नामवंत शाळेत नोकरी होती, परंतु खेडेगावात जाऊन शाळा काढायची, ह्या ध्येयाने ते मुरबाडला गेले तेथे त्यांनी 'न्यू इंग्लीश स्कूल' ही शाळा सुरू केली. मुरबाडला त्यांना सगळे वातावरण ही अध्यात्मिक वाटचालीसाठी पोषक, शांततेचे मिळाले. त्यामुळे माझ्या ती. आईचा संसार मुरबाडलाच सुरू झाला. मुरबाड हा डोंगराळ, जंगली भाग. वाघ, सापांचे वास्तव्य. वीज नाही नळ नाही. सोयी-सुविधांचा संपूर्ण अभाव तेव्हा होता.

कुलधर्म, कुलाचार, सण, लग्न, बारशी इत्यादीच्या कारणाने ती कल्याणला आपल्या सासरच्या मूळ घरी नेहमी जात-येत असे. कल्याणच्या घरी चार दीर, चार नणंदा, सख्खे व चुलत सासू-सासरे, नोकर-चाकर अशा सर्वांना तिने आपल्या वागण्या-बोलण्याने आपलेसे केले होते. लग्नानंतरची ५-६ वर्षे घर-संसार व आम्ही तीन मुले यात गेली.

लग्न झाले तेव्हा ती. आईचे शिक्षण फक्त मॅट्रिकपर्यंत झाले होते व राष्ट्रभाषा - सभा मुंबईच्या 'हिंदी' परीक्षांतील ती पंडित होती. योगायोग असा की, त्या काळात सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी हिंदी परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य केले होते. मुरबाड सारख्या ग्रामीण भागात त्या काळी आई जशी हिंदी 'पंडीत' होती तसे कोणी नव्हते. त्यामुळे अनायसे तिला सरकारी कर्मचाऱ्यांना हिंदी शिकविण्याची संधी चालून आली आणि हेच तिच्या सगळ्या शैक्षणिक कारकीर्दीचे बीज ठरले.

मुरबाडसारख्या ग्रामीण भागात (त्या काळी) आपले पतीचे शाळेत शिक्षकाची ही गरज आहे हे ओळखून तिने पुणे विद्यापीठातून बाहेरून अभ्यास करून बीए ही पदवी प्राप्त करून घेतली. व आपल्या पतीच्या ध्येयाच्या वाटचालीत साथ द्यायला सुरुवात केली. सुरुवातीला काही काळ अर्ध वेळ नोकरी केली. नंतर पुण्याला एस.एन.डी.टी. तून अध्यापकांना अनिवार्य असलेले बी.एड. शिक्षण पूर्ण केले.

तिच्या अभ्यासाचा विषय मराठी भाषा हा होता व खेरीज तो तिच्या आवडीचाही विषय होता. त्यामुळे तिचे मराठी नवे-जुने साहित्यावर काव्यावर विशेष प्रेम होते. अनेक कवी, वामनपंडित, प्राचीन कवी किंवा नवीन कुसुमाग्रज, मर्ढेकर, शांता शेळके इ.च्या काव्यरचना तिच्या तोंडपाठ होत्या. मराठी व्याकरणातील वृत्त-अलंकार इ. तिचे मुखोद्गत होते. तिचे अध्ययन-लेखन, अध्यापन-वक्तृत्व अशा अनेक गुणांची जाणीव तिला तिच्या कॉलेजमधील नामवंत प्राध्यापकांनी करून दिली व तिला लिहिण्याची कथा लेखनाची प्रेरणा त्यामुळे मिळाली. तिच्याजवळ मुळात प्रतिभा होतीच त्यामुळे तिने बी.एड. नंतर अनेक कथा लिहिल्या. रोहिणी, माहेर, हंस इत्यादी अनेक मासिकांतून तिच्या कथा प्रसिद्ध होत. कथा स्पर्धांमध्येही तिने पुरस्कार मिळविले आहेत. आकाशवाणी, दूरदर्शन अशा माध्यमांतूनही ती आता-आतापर्यंत म्हणजे वयाच्या ८०-८१ व्या वर्षी ही कथा-कवितांचे सादरीकरण करत होती. 'वृंदा' व 'तूच माझी लक्ष्मी' असे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. याच काळात म्हणजे १९७४-७५ च्या सुमारास तिने पुन्हा एकदा बाहेरून अभ्यास करून पुणे विद्यापीठाची मराठीतील एम.ए. ही पदवी प्राप्त करून घेतली. अनेक वर्षे ती शालांत परीक्षा म्हणजे इ.१० चे बोर्डाचे मराठीचे पेपर तपासून देत असे.

या अध्ययन-अध्यापनाच्या जोडीला तिच्याजवळ असलेले एक लेणे म्हणजे तिला जन्मजात लाभलेला गोड गळा. तिचा आवाज अतिशय गोड होता. नुसत्या गद्य बोलण्याला सुद्धा एक नाद होता. गाण्याचे तसे शास्त्रीय शिक्षण घेतलेले नव्हते. म्हणून पुण्याला बी.एड. ला असताना संगितातील बेसिक शिक्षण घेतले. भक्तिगीते, भावगीते नाट्यगीते इत्यादी कार्यक्रम ती तिच्या उमेदीच्या काळात करायची. शाळेतही शारदोत्सव, स्नेहसंमेलन इ. प्रसंगांना विद्यार्थ्यांकडून पेटी-तबला इ. साथीवर गाणी बसवून घ्यायचे काम तिच्याकडेच असायचे.

घरात किंवा ओळखीतही कुणाकडे बारसे, डोहाळ जेवण, मुंज, लग्न अशा समारंभात ती उत्स्फूर्तपणे काव्य रचून, चाल लावून गोड आवाजात म्हणत असे. स्वातंत्र्य सैनिक, हुतात्मा भाई कोतवाल, तानाजी मालसुरे यांसारख्या योद्धयांवरही तिने स्वतंत्रपणे पोवाडे रचले आहेत. सकाळी उठल्यापासून ती एखादे सुंदर गाणे गुणगुणत असायची व मग दिवसभर तेच गाणे जणू तिच्या मागे-पुढे होऊन तिच्या मुखात येत असे. हार्मोनियम काढून गाणी म्हणणे हा तिचा विसावा होता.

कथा-कादंबरी-गाणी यात जी संवेदनशीलता होती, ती तिच्या समाजातील लोकांबरोबर वागण्यातही होती. मुरबाड तालुक्यातील अनेक लोकांना अनेक प्रकारे मदतीचा हात तिने पुढे केला आहे. एखाद्या स्त्रीला सासरकडून, व्यसनी पत्नीकडून छळ होत असेल, उत्पन्नाचे काही स्वतंत्र साधन नसेल तर अशा परिस्थितीत आई तिला स्वतः कोर्टात किंवा वकिलांकडे नेऊन तिला योग्य ती मदत करीत असे. कोणाचे पेन्शन मिळत नसेल तर स्वतः सरकार दरबारी जाऊन त्याला पेन्शन मिळविण्यासाठी आवश्यक आहे ते करत असे. विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषणात-निबंधात-लेखनात मुद्दे काढून देणे इत्यादी मदत, मार्गदर्शन तर करत असेच पण खेरीज त्याचे घरगुती, आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी सहाय्य करत असे. यामुळेच की काय ती मुरबाड ग्रामपंचायतीत भाजपकडून निवडून आली होती व तिच्या कार्यकाळात तिने तिचे काम अत्यंत प्रामाणिकपणे व जेवढे चांगले करता येईल तेवढे करून आपला ठसा उमटविला होता. सुशिक्षित-सुसंस्कृत माणसांनीही राजकारणावर नुसत्या गप्पा न मारता राजकारण आपल्यासाठी नाही असे न म्हणता स्वतः भाग घेऊन काम करून दाखवले पाहिजे हा वस्तुपाठ आदर्श म्हणून ठेवला.

घरातही ती अत्यंत आदर्श गृहिणी होती. ती ठाण्यासारख्या शहरातून मुरबाडला ग्रामीण भागात आली होती, पण तिने त्याचा कधीही बाऊ केला नाही. विहिरीतून पाणी काढणे, अंगण शेणाने सारवणे, चूल पेटवणे इत्यादी कामेही ती सहज करायची. कोणतेही काम तिला वर्ज्य नव्हते. तिच्या उत्तम प्रकृतीचे रहस्य ती अंग झाडून काम करण्यातच आहे असे ती म्हणत असे. कोणत्याही कामाचा तिला कंटाळा आळस, वैताग माहीत नव्हता. हातात घेतलेले कोणतेही काम जिद्दीने पूर्ण करण्याचा तिचा साक्षेप वाखाणण्यासारखा होता. त्यामुळेच सर्व साधारणपणे माणसाला वृद्धपणी जगण्याचा कंटाळा येतो, वेळ जात नाही. अशा प्रकारचे प्रश्न तिला कधीही पडले नाहीत. जगण्यातला आनंद ती शेवटपर्यंत घेत होती.

त्या काळात मुरबाडला सातवीपर्यंत फक्त जिल्हापरिषदेच्या शाळा होत्या. आम्हीही ग्रामीण भागात, त्याच शाळेत शिक्षण घेत असल्याने आमच्या वागण्यात कुठेही असंस्कृतपणा येऊ नये. बोलण्यात कुठेही अशुद्ध उच्चार येऊ नये यासाठी ती दक्ष असे. प्रत्येक कामाची तिची एक शिस्त असे. काम अभ्यास नीटनेटकेपणाने, वेळेवर झालेच पाहिजे असा तिचा दंडक होता. काम पूर्ण न करता हात हालवत परत आलेले तिला अजिबात आवडत नसे. त्यामुळे आम्हा मुलांना तिचा आदरयुक्त धाक असे. हे सर्व आमच्या भविष्यातील चांगल्यासाठीच-हितासाठीच होते. जसे ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे की, 'मातेच्या कोपी थोकले स्नेह आधी! खाणे-पिणे-लेणे या गोष्टींना फाजील महत्त्व देऊ नये असे ती वेळोवेळी आम्हाला सांगत असे. पण अशी नुसतीच शिस्त नव्हती तर आमच्यावर त्याच्यापेक्षा कितीतरी अधिकपट प्रेम होते. मला लहानपणी सतत खोकला होत असे. अर्थातच खाण्या-पिण्यावर बंधन असे. त्यावेळेस तळलेले पदार्थ जसे पापड, भजी इ. ती स्वतःही कधी खात नसे. आजारपणात रात्र रात्र माझ्या उशाशी बसून मला शेकणे, औषध देणे इ. करत असे. आम्हा मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीतही तिची एक ठाम भूमिका होती. नुसते पदवीपर्यंतचे शिक्षण घेणे तिला मान्य नव्हते. त्यामुळेच माझी मोठी बहीण डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे ही बी.ए. नंतर एम.ए. झाली व लग्नानंतरही तिने दत्त-संप्रदायावर पीएच.डी. केले व मी ही बी.कॉम नंतर एल.एल.बी. केले. माझा मोठा भाऊ श्री. राजीव याचा कल शिक्षणापेक्षा व्यवसायाकडे आहे हे लक्षात घेऊन त्याच्या मागे ठामपणे उभी राहून त्याला व्यवसायाला प्रेरणा दिली व मदत केली. मराठी माणसाने सुद्धा व्यवसाय केला पाहिजे असे आपण आज म्हणतो पण माझ्या आईने सुमारे ४० वर्षांपूर्वीच अशा प्रकारचे स्वतः करून दाखवले होते.

तिन्ही मुलांचे विवाह योग्य त्या वयात करून दिल्यावर नातवंडे झाली. असा सुस्थितीत संसार चालू असताना, वयाच्या ५४-५५ व्या वर्षी तिला दुर्दैवाने पतिवियोग झाला. त्यानंतरच तिचे धैर्य पणाला लागण्याचे अनेक प्रसंग तिच्यावर कोसळले. शाळेतील तीन-चार वर्षे. नोकरीची शिल्लक होती. मुल व्यवसायानिमित्त कल्याणला राहात होती. ती एकटीच मुरबाडला राहायची. पण तिला भीती म्हणून माहीत नव्हती. पतिवियोगाचे संकट कमीच म्हणून काही वर्षांनी तिचा मोठा मुलगा श्री. राजीव अकस्मात ब्रेन ट्यूमरने देवाघरी गेला. त्याच्या शाळेत व कॉलेजात शिकणाऱ्या दोन मुली व त्याची पत्नी यांची जबाबदारीही आईने धैर्याने घेतली व आपल्या पुत्र-वियोगाचा आघात सहन करून आपली सून व आपल्या दोन नाती यांच्या मागे एखाद्या पहाडासारखी उभी राहिली. त्यानंतर तिने तिच्या

दोन्ही नातींना, सारिका व सुप्रिया यांना आपल्या वडिलांची कोणतीही उणीव भासू न देता त्यांच्यावर संस्कार केले त्यांचे शिक्षण लग्न व अगदी अखेरचा निरोप घेण्याच्या आधीच काही दिवस पतवंडांची बारशांपर्यंतची सर्व जबाबदारी पार पाडली व आपली सून हेमा हिला कोणतेही आर्थिक परावलंबित्व येऊ नये म्हणून पूर्ण व्यवस्था करूनच जगाचा निरोप घेतला.

अगदी शेवटच्या तिच्या १० वर्षांत म्हणजे सत्तरीनंतर तिने मुरबाडच्या आपल्या शेतात छोटी शेती व भाजीचा मळा फुलवला. तिला त्या झाडांच्या-फुलांच्या संगतीत एक निराळाच अपूर्व आनंद मिळतो असे ती सर्वांना सांगत असे. त्याच काळात मुरबाडचा जुना वाडा पाडून तिथे नवीन अद्ययावत तीन मजली सदनिका बांधून घेण्यातही पुढाकार घेतला. तेही काम वयाची ऐंशी वर्षे उमटलेली असताना पूर्ण केले. 'भारती सदन' हे नाव त्या दिमाखदार वास्तुला दिले आहे.

सर्वसाधारणपणे शहरात राहणारे लोक खेड्यात व्यक्तिमत्त्व विकास हवा तसा होत नाही. शिक्षण-संस्कार-संधी जशा हव्या तशा नसतात असे म्हणत असतात. पण आईने मात्र हा शहरातील लोकांचा गैरसमज आहे हे दाखवून दिले. अध्ययन-अध्यापनातील तिच्या नैपुण्याबद्दल तिला आदर्श शिक्षिका-जिल्हा पुरस्कार व तसेच आदर्श शिक्षिकेचा महाराष्ट्र राज्य पुरस्कार असे पुरस्कार मिळाले. खेरीज आदर्श महिला-समाजसेविका-सावित्रीफुले पुरस्कारही मिळाला आहे. कथालेखन-वक्तृत्व-भाषण-काव्य इ. ही छोटे-मोठे अनेक पुरस्कार बक्षिसे तिला मिळालेली आहेत.

मुरबाड तालुक्यात माझी आई व माझे वडिल वै. केशव वामन भातखंडे या चारित्र्यसंपन्न, देवतुल्य व्यक्तिमत्त्वांना कोणी ओळखत नाही असे नाही. माझ्या आईच्या व्यक्तिमत्त्वातील पैलू लक्षात घ्यायचे ठरवले तर ती आदर्श आई, आदर्श पत्नी, आदर्श शिक्षिका, आदर्श सासू, आदर्श आजी, गोड गळ्याची गायिका, मळा व शेत फुलवणारी शेतकरीण, समाजसेविका ते अगदी व्यावसायिक पातळीवर घर बांधून घेणारी व्यावसायिक असे एखाद्या पुरुषालाही जमणार नाही असे कर्तृत्व करून दाखवणारी अशी नऊ गुणांनी सम्पन्न असलेली नवदुर्गा होती. या सगळ्यांपेक्षा माझ्यासाठी-आम्हा भावंडासाठी ती उत्तम संस्कार करणारी, आम्ही चुकलो तर डोळ्यांत वेळीच अंजन घालणारी, तसेच तितकीच मायेची, पाखर घालणारी 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' अशी माझी प्रेमळ आई होती. तिच्या स्पर्शात काय जादू होती न कळे. कोणतेही लहान वा तान्हे मूल रडत असले आणि तिने ते घेतले की रडणे गायब!

तिच्या अखेरच्या काळीही, कोणाकडूनही कोणतीही सेवा करून न घेता केवळ दोनच दिवस हॉस्पिटलमध्ये राहून तिने जगाचा अखेरचा निरोप घेतला.

मराठे प्रतिष्ठानविषयी तिला आत्मीयता होती. 'हितगुज' आवडीने वाचीत असे. गुणी मराठे मंडळींचे कौतुक वाटत असे. गोवा संमेलनाला तसेच पुण्याच्या वर्धापनदिनाला ती आली होती.

अशी रीतीने उदंड व अखंड ऊर्जेचा स्रोत असा आदर्श तिने आमच्यापुढे ठेवला. शेवटी तिला साष्टांग दंडवत घालून हा स्मृतीलेख पूर्ण करते.

– अधिवक्ता **सौ. प्राची भिडे**, रोहा
'अद्वैत' बंगला, धनगर आळी, जि. रायगड,
फोन – ०२१९४२३२५३६

❖

## **वामन शंकर मराठे यांचे निधन** (पृ. २७७)

ठाणे येथील प्रतिथयश ज्वेलर्स आणि सामाजिक कार्यकर्ते वामन शंकर मराठे यांचे रविवारी संध्याकाळी एका खाजगी रुग्णालयात वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते. शहरातील सोन्या-चांदीचे व्यापारी म्हणून ख्यातकीर्त असलेले वामन शंकर हे शहरातील ज्ञानदेव सेवा मंडळ या संस्थेचे प्रमुख विश्वस्त होते. या संस्थेच्या माध्यमातून शहरात वारकरी संप्रदायाचा प्रचार करण्यात त्यांचे मोठे योगदान होते. त्यांच्या पश्चात सौ. शीलाताई, अजित आणि अभय ही दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ('हितगुज' मासिकात त्यांची विस्तृत मुलाखत आली होती.) म.प्र. द्वारा वामन शंकर मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## **मानसन्मान**

श्री. सतीश मराठे यांना 'सहकार रत्न' पुरस्कार

आपले कुलबांधव श्री. सतीश मराठे (पृ.१२९) यांना सहकार क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी केल्याबद्दल 'सहकार रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथे दि. २०-११-१५ रोजी झालेल्या समारंभात त्यांना ५ लाख रुपये, शाल व स्मृतीचिन्ह देण्यात आले.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. सतीश मराठे यांचे हार्दिक अभिनंदन मराठे प्रतिष्ठानला श्री. सतीश मराठे यांचा अभिमान वाटतो.

# नकोशी

• **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे** (पृ. १२०)

पहाटेची प्रसन्न वेळ होती. सगळीकडे शांतता होती. पक्ष्यांची किलबिल, झाडांच्या पानांची मंद सळसळ, वातावरण उल्हासित करीत होती. गिरिजाबाईंनी पूजेसाठी बागेतील फुले खुडली. त्या उंच असल्याने अगदी वरपर्यंत फूल काढायला त्यांचा हात पोचत असे. बागेत फुलांचा सुगंध भरून राहिला होता. गिरिजाबाईंना झाडावरील सर्वच्या सर्व फुले खुडायला आवडत नसे. प्रत्येक झाडावर किमान एक तरी फूल त्या शोभेसाठी ठेवायच्या. त्यांची नात सर्वच्या सर्व फुले खुडीत असे. बाग अशी 'ओकीबोकी' झालेली त्यांना आवडत नसे. झाडावरील सर्वच्या सर्व फुले खुडल्याबद्दल त्या नातीला रागावत असत.

...,हे त्यांना आठवले आणि त्या खिन्नशा हसल्या. तोच, ''आजी तुम्हाला फोन आलाय घरून'' असे. सांगत रमेश आला. रमेश आश्रमातील एक सेवक. हसतमुख. कामाला सदैव तयार. त्याचे बोलणेही मृदू, लाघवी, आश्रमात आल्यापासून रमेशला त्यांनी कोणावरही चिडताना पाहिला नाही. त्याच्या या गुणांमुळे आजींना रमेश आवडायचा.

''आई, अजून दहा-पंधरा दिवस लागतील बंगल्याचे काम पुरे व्हायला. बाहेरच्या हॉलचे काम पूर्ण होत आले असून बेडरूम आणि कीचन बाकी आहे. तेव्हा तुला तिथेच काही दिवस राहावे लागेल.''

...अेवढेच सांगून श्रीकांतने फोन ठेवलाही.

गिरिजाबाई म्हटलेले, ''ठीक आहे'' अेवढे दोन शब्द अेकायलाही त्याला वेळ नव्हता. त्याला आईच्या प्रतिक्रियेची आवश्यकताही वाटली नाही. खरं तर गिरिजाबाईंना फोनवर कितीतरी बोलायचे होते. सर्वांच्या खुशाली विचारायच्या होत्या. मीनूची सकाळची शाळा ना? रेणू बाळंतीण झाली का? ह्यांचे पेन्शनचे काम नेनेकाकांनी केला का? निहारची मुंज कधी ठरली? जावईबापू अमेरिकेतून कधी परतणार? शेजारच्या जोशीआजींचे मोतीबिंदूचे ऑपरेशन झाले का? त्यांना अुजव्या डोळ्याने अगदी अंधूक दिसत होते पण त्यांच्या मुलाला त्यांना डॉक्टरकडे न्यायला वेळच मिळत नव्हता. त्या त्यांना डॉक्टरकडे घेऊन जाणार होत्या. त्यांनी तसे ठरविलेही होते पण कसचे काय आश्रमातील मुक्काम आणखी वाढला होता. अजून काही दिवस राहावे लागेल असे सकाळीच त्यांच्या मुलाने त्यांना कळविले होते. 'काही' दिवस म्हणजे नेमके किती दिवस, जवळजवळ सहा महिने तर येथे येऊन त्यांना पूर्ण झाले होते. आणखी किती काळ राहावे लागणार? त्यांना त्यांच्या गोजिरवाण्या नातीची, मीनूची आठवण सतत यायची.

...मीनू सकाळी शाळेत जायला लवकर अुठते का? पटापट आवरत असेल का? मीनूला अुशीरा अुठायची सवय. तिला अंथरूणात लोळायला अतिशय आवडायचे. मीनू अुठ, शहाणं माझं बाळ, आज दिवसभर काय काय गमती-जमती करायच्या, असा पाढा वाचत, गिरिजाबाई तिला आंजारून-गोंजारून अुठवत असत. तिच्या आईला म्हणजे गिरिजाबाईंच्या सूनेला, लताला नोकरीला जायची घाई. सकाळ झाली की, घड्याळाबरोबर तिची शर्यत सुरू व्हायची. अेकदा हाक मारल्यावर गुणी मुलीसारखी मीनू अुठली नाही की, मग ती खेकसायचीच मीनूच्या अंगावर, काय करणार, तिचाही नाईलाज होता. मीनूला आज्जीच सकाळी झोपेतून अुठवायला हवी असायची. तिच्या मायेचा अुबदार स्पर्श मीनूला हवाहवासा वाटायचा. ती तसे बोलूनही दाखवायची, म्हणायची, ''आज्जी तू मला अुठवलेस ना की सबंध दिवस कसा 'फर्स्टक्लास' जातो. अेकदम ताजे-तवाने. खूप छान वाटते.''

हे सर्व आठवलं आणि ...काटेरी झुडपांवरून वस्त्र ओरबडत जावं तसं त्यांच्या मनाला झालं. पोरीला माझी नक्की आठवण येत असेल. ती वाट पहात असेल आपली आजीला घरी कधी आणणार म्हणून पप्पा-मम्मींना सारखे विचारत असेल, काय अुत्तर देत असतील तिला ते! त्यांनी दिलेले अुत्तर तिच्या बालबुद्धीला पटतही असेल...

....''आई तू कशी आहेस? आश्रमातले जेवण तुला आवडते का? तुझा वेळ तिथे कसा जातो? ब्लडप्रेशरच्या गोळ्या वेळेवर न विसरता घेतेस ना?'' यातले काही म्हणजे काही सुद्धा श्रीकांतला विचारावेसे वाटले नाही, असे मनात येताच त्या व्यथित झाल्या.

त्यांना त्यांच्या यजमानांचे शिवरामपंताचे बोलणे आठवले, ते नेहमी म्हणत, ''हे बघ गिरिजा, कोणाकडून कसलीही अपेक्षा करू नकोस, अगदी पोटच्या पोरापासूनही; कारण अपेक्षेत दुःख असत'' हे तत्त्वज्ञान सांगायला ठीक आहे पण ते पचनी पडायला किती जड जात आहे याची प्रचिती गिरिजाबाईंना आली. आपल्या मुलांविषयी गैरसमज करायचा नाही - ती संसारात रमली आहेत - मशगूल झाली आहेत एवढेच म्हणायचे...?

...दि. १५ नोव्हेंबर. लताचा आज वाढदिवस. न

विसरता गिरिजाबाईंनी लताला म्हणजे त्यांच्या लाडक्या सूनेला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी फोन केला. तिने फक्त 'थँक यू' म्हटले आणि फोन ठेवला. गिरिजाबाईंना आश्चर्य वाटले आणि खूप वाईटही.

...मुलं, सुनांना एकाएकी काय झाले? आपल्याशी ती का तुटक वागताहेत? आपले काही चुकले आहे का? आपण तर त्यांच्या संसारात लुडबूड न करता, त्यांना स्वातंत्र्य अुपभोगू देत होतो. पडेल ते काम आनंदाने करण्याचा आपला स्वभाव, आपले काही चुकले आहे का? मुले कोरडेपणाने का वागताहेत? आर्थिकदृष्ट्याही आपण सक्षम आहोत. आपला भार त्यांना नाही. ...''आजी माझे तुमच्याकडे थोडे काम आहे...'' रमेशच्या बोलण्याने त्या विचारातून भानावर आल्या.

बोलू का नको या विचाराने रमेश अडखळल्याचे मनाने आणि कृतीने समजूतदार असलेल्या गिरिजाबाईंच्या तात्काळ लक्षात आले. त्या म्हणाल्या, ''बोल ना! अगदी मोकळेपणाने बोल.''

''मला थोडे अुसने पैसे पाहिजे होते. भाडे खर्चासाठी. गावी जाईन म्हणतो. आईला खूप दिवसात भेटलो नाही, तिची फार आठवण येते. मन अगदी व्याकुळ झाले आहे, काही सुचत नाही, पगार झाला की लगेच पैसे देईन. विश्वास ठेवा माझ्यावर...''

रमेशला पैसे देताना गिरिजाबाईंचे मन अगदी भरून आले.

त्यांनाही घरची आठवण येऊ लागली म्हणून न राहवून त्यांनी घरी फोन केला. लताने फोन घेतला, ''मी खूप घाईत आहे, बाहेर जाण्याच्या तयारीत आहे. नंतर सवडीने सविस्तर बोलू'' तिने फोन ठेवला.

...त्यानंतर इतके महिने लोटले तरी तिला सवड मिळत नव्हती का ती मुद्दामहून सवड काढत नव्हती? मुलांचा विचार तरी काय आहे? आपल्या वाट्याला अुपेक्षा येणार का?

...आज या क्षणी गिरिजाबाईंना शिवरामपंतांची अगदी आर्ततेनं आठवण येत होती. आज ते हवे होते. आपण त्यांच्या 'सावली'त बसून (त्यांच्या आवडीचे नाव बंगल्याला दिले होते – 'सावली') ते गिरिजाबाईंना नेहमी म्हणायचे, तू माझी सावली आहेस... पण प्रकाश गेला सगळा लखलखाट मागे ठेवून आणि तरी सावली मागे रेंगाळली, निस्तेज, अर्थहीन...

...आपण दोघांनी इतिहासाची अुजळणी केली असती. कुणाकुणाच्या आठवणी निघाल्या असत्या, दोघं मिळून कधी हसलो असतो, कधी गहिवरलो असतो. त्या गहिवरण्यातही एक आगळं सुख मिळालं असते. त्यांच्या मनात नाना आठवणीचं आवर्त सुरू झालं होतं. पन्नास वर्षांची वाटचाल झाली होती. काटेरी रस्त्यावरून दगड धोंड्याच्या ठेचा खात.

शिवरामपंतांनी श्रीकांतच्या वडिलांनी, किती धडपड केली होती श्रीकांतला शिकवायला! म्हणायचे, 'गिरिजा, तुझं माझं शिक्षण अर्ध्यावरच सुटलं पण आपण आपल्या श्रीकांतला खूप शिकवू! मोठ्ठा करू! त्याला हवं तेवढे शिकू दे! परिस्थितीची झळ त्याला पोचायला नको... म्हणून दिवसा काम करून ते जास्तीची रात्रपाळीही करत होते.

...त्या रात्री, रात्रभर त्यांना झोप आली नव्हती. पलंगावर त्या तळमळत होत्या. असा एवढा कसा इतक्यात बदलला श्रीकांत? आपल्याला आपली मुलं टाळताहेत की काय? ती आपल्याला 'परकी' होणार की काय. निरर्थकता, पोकळ आयुष्य आपल्या वाट्याला येणार की काय याचे भय त्यांना वाटू लागले. त्यांच्या जीवनातले आपले स्थान हरवले कसे? त्यांच्या आयुष्यातील आपली अुपयुक्तता संपली म्हणून की, आपण आता म्हातारे होत जाणार म्हणून... परावलंबी होणार म्हणून मुलगा आपल्याला टाळतो आहे. 'गरज सरो वैद्य मरो' असे तर त्यांचे धोरण नाही ना? आपण मुलांच्या या तुटक वागण्याचा अर्थ कसा लावायचा? एवढी त्यांची माया आटली कशी? का 'माया' नव्हतीच? होता तो संधीसाधूपणा. अप्पलपोटेपणा.

या स्वार्थाच्या जगात कोणी कोणाचा नसतो. आपण त्यांना 'नकोशा' झाल्या आहोत हे त्यांना मनोमन समजले. नको असलेले जिणे आपल्याला जगावे लागणार. 'जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे बा अंतकाळीचे कोणी नाही' ही ओळ त्यांच्या ओठी नाचू लागली. त्यांनी दीर्घ सुस्कारा सोडला.

...गिरिजाबाईंना फार अेकटं अेकटं वाटलं. माझे माझे म्हणून जपलेले पाश कसे अर्थहीन आहेत ते जाणवून त्या खिन्न झाल्या. खोलीच्या बाहेर येऊन त्या अंगणातच बसल्या. थंडी होती. दिवस मिटतच होता. अस्पष्ट आणि सोनेरी प्रकाशही अंधाराच्या रंगाचा होत होता.

...'आई, तब्येत बरी नाही का? भूक नाही का लागली? गरमगरम जेवायला चला...' रमेश त्यांना बोलावत होता.

गिरिजाबाईंना गलबलून आलं. ...निदान रमेशला तरी आपल्याबद्दल आस्था वाटते, या विचारानं!

❖

सुविचार

सत्य असत्यासी मन केले ग्वाही।
मानियले नाही जनलोका।

– संत तुकाराम

सुविचार

# संवाद कुलबांधवांशी

• **श्री. हेमंत अरुण मराठे** (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी – ९२२०६९९९५७

१०व्या अ.भा. मराठे परिवाराचे संमेलन आपण सांगली येथे आयोजित केले होते. आपल्या सर्वांच्या मेहनतीने, सहकार्याने हे संमेलन यशस्वी झाले. आपल्या या संमेलनामध्ये महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश अशा ५ राज्यांमधून आपले कुलबांधव उपस्थित होते, त्यामुळे खऱ्या अर्थाने हे अ.भा. संमेलन झाले.

सांगली येथे हे संमेलन आयोजित करण्यामध्ये तेथील श्री. वि.म. मराठे हे फार उत्साही होते, खरेतर हे संमेलन म्हणजे त्यांचे टॉनिक आहे असे त्यांचे चिरंजीव श्री. विश्वेष याचे म्हणणे! त्यांना उत्तम साथ दिली सांगलीचेच श्री. भास्कर मराठे यांनी. शिवप्रतिष्ठान संस्था सांगलीचे काम करण्याचा अनुभव असलेल्या भास्कररावांनी हे संमेलन यशस्वी करण्यामध्ये खूप मोठा वाटा उचलला. इचलकरंजी, रत्नागिरी, कोल्हापूर अशा शहरांमध्ये जाऊन तेथील कुलबांधवांना ते भेटले. तसेच स्थानिक कुलबांधवांना भेटणे, स्वागतासाठी लागणारी सोनचाफ्याची फुले तसेच इतर बऱ्याच गोष्टी त्यांनी सहजपणे कोणताही मोठेपणा न घेता केला. त्याचबरोबर संमेलन नक्की करण्याच्या पहिल्याच सभेमध्ये त्यांनी आर्थिक भार उचलण्यासाठी रु.२१०००/- इतकी भरघोस देणगी जाहीर केली. त्याला प्रतिसाद म्हणून म.प्र.चे कोषाध्यक्ष श्री. श्रीनिवास मराठे यांनीही रु.२१०००/- देण्याचे जाहीर केले. त्यामुळे संमेलन घेण्याचा उत्साह वाढला. तरुण वर्गानेही आपल्या जबाबदाऱ्या चोख बजावल्यामुळे हे संमेलन अतिशय उत्साहात पार पडले.

या संमेलनाच्या तयारीसाठी दोन वेळा सांगलीला जाणे झाले. श्री. वि.म. मराठे यांच्या घरी सभा झाल्या. वि.म. मराठे यांचा उत्साह खुप होता. तब्येत बरी नसताना देखील त्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. त्यांचा मुलगा विश्वेष आणि सून, पत्नी यांचाही यामध्ये सहभाग होता. त्यांना श्री. मोरेश्वर मराठे हे आपल्या परीने पाठबळ देत होते.

या संमेलनामध्ये बऱ्याच नवीन कुलबांधवांची ओळख झाली. काहीजण एवढे दिवस दूरध्वनीद्वारे संपर्कात होते. ते प्रत्यक्ष भेटले. काहीजण बऱ्याच वर्षांनी पुन्हा भेटले. सर्वजण एकमेकांना भेटण्यासाठी आतुर झाले होते. दोन दिवस केव्हा गेले कळलेही. ज्यांना शक्य झाले त्यांनी त्यांच्या कला सादर केल्या. प्रेक्षकांनी उत्स्फुर्तपणे प्रतिसाद दिला. कोणतीही तक्रार न करता सर्व कुलबांधव भगिनींनी संमेलनाचा पूर्णपणे आस्वाद घेतला. या संमेलनाने मला काय दिले? म.प्र. साठी आणखीन काम करण्याची स्फूर्ती दिली, उमेद दिली. तसेच सांगली नगरी आपली वाटू लागली. श्री. वि.म. मराठे यांच्यासारख्या ज्येष्ठ व्यक्तींच्या संपर्कात रहाता आले. श्री. भास्कर मराठे यांच्यासारखे संघटनेचा अनुभव असणारे, सामाजिक कार्य समरसून करणारे मित्र मिळाले आणि मुख्य म्हणजे त्यांच्याच घरी एका ऋषितुल्य व्यक्तीमत्त्वाचा सहवास मिळाला, आशीर्वाद मिळाला. हे व्यक्तीमत्व म्हणजे शिवप्रतिष्ठानचे श्री. संभाजीराव भिडे, म्हणजेच भिडे गुरुजी. नवनवीन लोक भेटावेत, एकमेकांचे अनुभव कळावेत, जाणून घ्यावेत हाच तर उद्देश असतो संमेलनाचा, तो पूर्णपणे साध्य झाला.

❖

---

## **प्रिया मराठे** (पृ. २७७) **मोठ्या पडद्यावर 'विघ्नहर्ता महागणपती' चित्रपटाद्वारे पदार्पण**

२०१० मध्ये 'लिम्का बुका'त नोंद करण्यात आलेल्या कोकणातील खवळे महागणपतीची कथा लवकरच रुपेरी पडद्यावर पाहता येणार आहे. 'विघ्नहर्ता महागणपती' असे त्याचे नाव असून, मराठी मालिकांतून घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री प्रिया मराठे त्यातून रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. शालिनी फिल्म्स निर्मित 'विघ्नहर्ता महागणपती' चित्रपट १९ फेब्रुवारीला प्रदर्शित झाला.


मोठ्या पडद्यावरील पदार्पणाबाबत प्रिया म्हणाली, 'माझा पहिलाच चित्रपट असल्याने मला प्रचंड टेन्शन आले होते. चित्रपटाचा माहोल काहीसा वेगळा असल्याने थोडे दडपण येतेच; पण माझी टीम सहकार्य करणारी असल्याने मी अतिशय आनंदात काम केले. आम्ही सगळेच एकमेकांना समजून घ्यायचो. प्रत्येक सीनच्या आधी दिग्दर्शकांशी व सहकलाकारांशी मिळून चर्चा करायचो. टीव्ही मालिका सुरू असेपर्यंतच तुम्ही प्रेक्षकांच्या लक्षात राहता; पण चित्रपटामुळे कायमस्वरूपी त्यांच्या आठवणीत राहता येते.

प्रेक्षकांनी मला मालिकांसाठी भरभरून प्रेम दिले. आता चित्रपटातही ते मला असेच प्रेम देतील, याची खात्री आहे. 'विघ्नहर्ता महागणपती'चे दिग्दर्शन राजेश चव्हाण यांनी केले असून, प्रियाबरोबरच समीर धर्माधिकारी, अलका कुबल, शरद पोंक्षे, विजय चव्हाण आदी कलाकार त्यात मुख्य भूमिकात दिसतील.

❖

# ‘जाने वो कैसे लोग थे’ - हेमंतकुमार

• श्री सुधाकर प्रभाकर मराठे भ्रमणध्वनी - ९८२२३२९७७०



आपली आताची साठ वर्षांच्या पुढील पिढी खरोखरच भाग्यवान-संगीताच्या बाबतीत तर नक्कीच! विशेषतः हिंदी, मराठी चित्रपटसंगीत. सन १९४५ ते १९७५-८०च्या काळात ऐकलेले व आजही मना-मनात बसलेले चित्रपटसंगीत. एकाहून एक सरस संगीतकार, गीतकार आणि गायक. त्या काळी रेडिओसारखेच माध्यम उपलब्ध असल्याने छोटी-मोठी कामे करताना- अगदी अभ्यास करतानाही सुमधुर शब्द आणि सहज-सुंदर चाल असलेली गाणी म्हणजे जणू खजिनाच! सिनेसंगीत, भावगीते, नाट्यगीते, शास्त्रीय संगीतावर आधारित... असंख्य प्रकार. पण मन आणि तनही ताजेतवाने करणारे संगीत.

अनिल विश्वासपासून रवींद्र जैनपर्यंतचे संगीतकार, रफी-लतापासून जयवंत कुलकर्णीपर्यंतचे गायक आणि शैलेंद्रपासून गुलशन बावरापर्यंतचे गीतकार... प्रत्येकाचे योगदान वेगवेगळे, पण सर्वांचा ‘आत्मा एकच-संगीत!’ यातीलच एक धीरगंभीर आणि थोड्याशा घोगरट आवाजाचा गायक-हेमंतकुमार! नुसताच गायक नाही तर संगीतकार, सिनेदिग्दर्शक आणि चित्रपट-निर्मातासुद्धा!

दि. १६ जून १९२० रोजी उत्तर प्रदेशातील वाराणसीसारख्या तीर्थक्षेत्रात जन्मलेला, बंगाली गायक हेमंतकुमार मुखोपाध्याय. वडिलांची इच्छा नसतानाही त्यांचा ओढा संगीताकडेच होता. गावातील कोणत्याही गाण्याच्या कार्यक्रमाला ते आवर्जून उपस्थित राहत असत व सतत गाणी गुणगुणत असत. त्यामुळेच शाळेतून हकालपट्टी होण्याचा प्रसंगही त्यांच्या आयुष्यात आला होता. तरीसुद्धा त्यांचा गाण्याचा छंद तसूभरही कमी झाला नाही. पुढे ‘ऑल इंडिया’ रेडिओवर गाण्याची संधी मिळताच त्यांच्या कलेच्या प्रवासास सुरुवात झाली.

वडिलांच्या इच्छेखातर ते इंजिनिअरिंग शिकू लागले खरे, पण त्यात न रमता त्यांनी शिक्षण अर्धवटच सोडून दिले आणि पुन्हा ते गाण्यातच रमू लागले. ‘कोलंबिया रेकॉर्ड’ कंपनीने त्यांच्या आवाजात बंगाली गीताची ध्वनिमुद्रिका काढली आणि त्यांना बंगाली गाणी गाण्याची संधी मिळू लागली.

साहजिकच एकदा एक प्रसिद्ध संस्थेच्या जाहीर कार्यक्रमात त्यांना गाण्यासाठी निमंत्रण मिळाले, पण गाण्याची संधीच मिळाली नाही; कारण त्याच कार्यक्रमात प्रसिद्ध पार्श्वगायक ‘पंकज मलिक’ आले आणि त्यांचाच कार्यक्रम सुरू झाला. पण या निराशेतूनच पंकजजींचा आवाज त्यांना खूप काही शिकवून गेला आणि त्यांचा जादुई आवाजच पुढे हेमंतजींच्या आयुष्याची पुंजी ठरली. पुढे कोलंबिया कंपनीनेच त्याच्या हिंदी गाण्याची ध्वनिमुद्रिका काढली आणि हेमंतजींच्या हिंदी गाण्यांनाही लोकप्रियता मिळू लागली.

ज्या ‘पंकजजीं’च्या आवाजाची ठेव हेमंतजींनी जपली होती, त्यांनीच हेमंतदांना हिंदी चित्रपटात गाण्याची संधी दिली, तो चित्रपट होता ‘मीनाक्षी’ - १९४२ चा आणि गाणिं होतं, ‘आँखो की ओर जो रहता था’. हे गाणं व अशीच एक-दोन गाणी पंकजजींनी त्यांना दिली. अर्थातच, आज ही गाणी ऐकण्याची संधी मिळण्याची शक्यता कमी आहे. यातूनच पुढे बंगाली चित्रपट ‘पूर्वरंग’द्वारे ते संगीतकार बनले. खरं तर गाण्याचीच आवड असल्याने त्यांनी उत्साद फैय्याज हुसेन खाँ, फणिंद्रनाथ, शैलेशचंद्र दासगुप्ता यांच्याकडून गायनाचे शिक्षण घेतले होते म्हणूनच पुढे त्यांना संगीतकार बनण्याची संधी मिळाली तरी गायक म्हणूनच ते जास्त खुलले.

पुढे मुंबईला फिल्मीस्तान कंपनीने त्यांना बोलावून घेतले आणि त्यांच्या गुणांनुसार त्यांना ‘आनंद मठ’ चित्रपटाच्या संगीतकाराच्या रूपात संधी दिली. या चित्रपटासाठी लता मंगेशकरनेच गावे, अशी हेमंतदांची इच्छा होती; पण लता आणि फिल्मीस्तानचे सख्य नव्हते. तरीसुद्धा केवळ नवा संगीतकार म्हणून दीदी गाण्यास तयार झाल्या. तब्बल २०/२२ टेक होऊनही निर्माते खुश नव्हते, तरीही लताने न कंटाळता गाणे केले - ‘वंदे मातरम्’! आपण नेहमी ऐकत व गात

आलेल्या 'वंदे मातरम्'पेक्षा याची चाल वेगळी आहे, पण आजही त्याची प्रसिद्धी आहेच. यातूनच पुढे दीदी व हेमंतजींची स्वरसंगत बहरत गेली आणि या द्वयीची असंख्य गाणी अजरामर झाली. याच काळात हेमंतजींची 'ये रात ये चांदनी फिर कहाँ' (जाल–सचिनदेव बर्मन) आणि 'न ये चाँद होगा, न तारे रहेंगे' (शर्त–हेमंतजी) ही गाणी खूपच गाजली; आजही ती लोकप्रिय आहेत.

याच वर्षी म्हणजे १९५४ मध्ये हेमंतजींना फिल्मीस्तानचा 'नागीन' चित्रपट मिळाला आणि खऱ्या अर्थाने हेमंतकुमार प्रसिद्ध संगीतकार ठरले. 'नागीन'मध्ये चक्क बारा गाणी होती, सर्वच गाणी गाजली. पण सर्वांत गाजलेले आणि आजच्या पिढीलाही मोहविणारे गाणे म्हणजे, 'मन डोले, मेरा तन डोले', (लता) हे होय. याच चित्रपटातील 'जादूगर सैंया', 'उँची उँची दुनिया की दिवारे' (लता) आणि स्वतः हेमंतजींनी गायलेली 'काशी देखी, मथुरा देखी... तेरे द्वार खडा एक जोगी' व 'ओ जिंदगी के देनेवाले'सारखी गाणी होती. त्यांमध्ये लतादीदींचा आर्त आणि मोहविणारा स्वर, तर हेमंतजींचा धीरगंभीर व घोगरट स्वर वेगळ्याच दुनियेत घेऊन जातो. याच (नागीन) चित्रपटातील 'गारूड्याची पुंगी' ही विशेष गाजली. अर्थातच, ती नक्की 'के व्हायोलिन' वर हेमंतजींचे त्या वेळचे सहायक कल्याणजी यांनी वाजवली, का दुसरे एक सहायक संगीतकारच रवी यांनी ती धून 'हार्मोनियम' वर वाजवली, याबद्दल 'मतभिन्नता' आहे.

पुढेही 'छुप गया कोई रे' (चंपाकली) – 'चली गोरी पी से मीलन को' (एक ही रास्ता), 'कश्ती का खामोश सफर हैं, (गर्लफ्रेंड) 'ओ रातके मुसाफिर चंदा...', 'वृंदावन का कृष्ण कन्हैया...' (मिस मेरी) इत्यादी स्वतःच्याच संगीतातील गाणी गाजली. शिवाय 'बंदिश', 'सम्राट', 'भागवत–महिमा', 'दुर्गेश नंदिनी', 'इन्स्पेक्टर', 'बंदी', 'लालटेन', 'ताज'सारखे अनेक चित्रपट मिळाले. यातील काही गाण्यांनाच लोकप्रियता प्रसिद्धी मिळाली, तरी 'नागीन'ची उंची मात्र कोणीच गाठली नाही. पण हेमंतजी 'हिंदी चित्रपट'सृष्टीत स्थिरावू लागले, हे नक्की.

'नागीन'च्या वेळीच, त्यांच्याच 'जागृती' चित्रपटातील गाणीही गाजली होती. 'आओ बच्चो तुम्हे दिखाएँ झाँकी हिंदुस्तानकी' (गायक आणि गीतकार कवी प्रदीप), 'दे दी हमे आजादी बिना खड्ग बिना ढाल, साबरमती के संत तूने कर दिया कमाल' (आशा भोसले); शिवाय 'हम लाये है तुफानसे... इस देशको रखना......' (रफी) ही गाणी आजही लोकप्रिय आहेत. बहुधा रफी आणि आशाच्या आवाजाचा वापर हेमंतजींनी प्रथमच केला असावा.

'कल्याणजी–आनंदजी' आणि 'रवी' हे हेमंतजींचेच सहायक होते, पुढे ते नावाजलेले संगीतकार घडले. शिवाय हेमंतदादांना त्यांनी अनेक गाणीही दिली. 'तुम्हे याद होगा, कभी हम' (सट्टा बाजार), 'न तुम हमे जानो..... मगर लगता' (बात एक रातकी), 'निंद न मुझको आये....' (पो. बॉ. नं. ९९९), 'ए दिल अब कही ना जा....' (ब्लफ मास्टर) या सर्व गाण्यांची गोडी अवीटच आहे.

हेमंतजींचा छान उपयोग सचिनदेव बर्मनांनी केला. खरं तर देव आनंदसारख्या नायकाला किशोरचाच आवाज योग्य असतानाही 'है अपना दि तो आवारा' (सोलवा साल) सारखे चिरतरूण गाणे दिले. त्याशिवाय इतर (संगीतकारांची) ही गाणी हेमंतदांनी गायली. सी. रामचंद्र स्वतःही गायक होते, पण त्यांनी 'जिंदगी प्यार की दो चार घडी....' (अनारकली) मध्ये हेमंतदांना संधी दिली; शिवाय 'लहरों पे लहर...' (छबिली–स्नेहल भाटकर), 'सूरज रे जलते रहना...' (हरिश्चंद्र तारामती–लक्ष्मीप्यारे), 'राही तू मत रुक जाना...' (दूर गगन की छाँवमे–किशोर कुमार), 'रूला कर चल दिए...' (बादशहा–शंकरजयकिशन) अशी इतर संगीतकारांची गाणीही गाजली.

सलील चौधरी, रोशन यांसारख्या संगीतकारांचा प्रभावही हेमंतदांवर होता. विशेषतः रोशनजी आणि हेमंतकुमार हे जुने मित्र. केवळ रोशनजींच्या आग्रहामुळेच 'छुपा लो दिलमें ये प्यार मेरा' (ममता) सारखे गाणे त्यांनी अजरामर केले, तर 'गंगा आये कहाँ से' (काबुलीवाला) सारखे गीत सलीलजींनी दिले. बंगालचा व नंतर हिंदीमध्येही गाजलेला नायक म्हणजे 'उत्तमकुमार'. बंगाली आणि अनेक हिंदी गाण्यांतही दोघांची जोडी म्हणजे (मुकेश – राज कपूर, किशोर – राजेशप्रमाणेच) उत्तम–कुमार–हेमंतकुमार ही जोडी समीकरण जुळवून गेली आणि या जोडीनेच बंगाली चित्रपटगीते गाजवून अमर केली.

'१९५४'च्या 'नागीन'नंतर जवळजवळ १० वर्षे हेमंतकुमार तसे फार गाजले नाहीत. पण १९६२ मध्ये 'बीस साल बाद' या चित्रपटाने ते पुन्हा प्रसिद्धीच्या झोतात आले. 'कहीं दीप जले कहीं दिल', 'सपने सुहाने लडकपनके' (लता), 'जरा नजरोंसे कह दो जी', 'बेकराक करके हमे...... आप को हमारी कसम लौट....' (स्वतः हेमंतदा) ही गाणी आणि चित्रपटही गाजला. याच वर्षीचा 'फिल्मफेअर' पुरस्कारही लता मंगेशकरांना उत्कृष्ट गायिका आणि 'शकील बदायुनी' यांना 'उत्कृष्ट गीतकार' म्हणून 'कहीं दीप जले' या गीताला मिळाला. पण 'उत्कृष्ट' संगीतकार म्हणून हेमतजी मात्र त्यापासून वंचितच राहिले.

'बीस साल बाद'नंतर हेमंतदांनी पुन्हा अनेक चित्रपट व

गाणीही गाजवली. 'मुहब्बत जिसको कहते है' (माँ-बेटा), 'मेरी बात रही मेरे मनमे', 'भँवरा बढा नादान', 'साकिया आज मुझे', 'न जाओ सैंया..... कसम तुम्हारी', 'पिया ऐसो जिया मे..... तन मन की (साहिब बीबी और गुलाम), 'जिंदगी कितनी खुबसूरत है', 'जब जाग उठे अरमान', 'एक बार जरा फिर कह दो, आणि शीर्षक गीत (बिन बादल बरसात) 'झूम झूम ढलती रात', 'ये नयन डरे डरे', 'राह बनी खुद मंजिल' (कोहरा), 'तेरा हुस्न रहे', 'सारा मोरा कजरा', (आरती मुखर्जी-रफी- दो दिल), 'धीरे धीरे मचल', 'भिगी भिगी फिजा', 'क्यूँ मुझे इतनी... के घबराता है दिल', 'या दिलकी सुनो' (अनुपमा), 'हवाओं पे लिख दो' (दो दूनी चार), 'हमने देखी है... इल्जाम न दो', 'वो शाम कुछ अजीब थी', आणि 'पुकार लो' (खामोशी) सारखी असंख्य गाणी स्वतःही गायली आणि इतरांकडूनही गाऊन घेऊन लोकप्रिय केली.

आपल्या मराठी चित्रपटसृष्टीतही हेमंतजींची अनेक गाणी-विशेषतः कोळीगीते प्रसिद्ध आहेत. 'मी डोलकर... दर्याचा राजा', 'गोमू संगतीनं.... (हा खेळ सावल्यांचा), 'प्रीतीच्या चांदराती घेऊनी हात...' (भावगीत) या गाण्यांनी लोकप्रियता मिळविली. शिवाय वंदना विटणकरांचे 'प्रीती तुझी मनमोहिनी, फुलवी मनी संजीवनी' भावगीतही प्रसिद्ध आहे. तसेच 'नायकिणीचा सज्जा' या मराठी चित्रपटालाही त्यांनीच संगीत दिले आहे. लताजींच्या स्नेह-सूरांमुळेच, हृदय नाथजींनी कोळीगीतांसाठी मराठी शुद्ध येत नसतानाही दादांची निवड केली आणि त्यांनी ती सार्थही ठरविली. लताच्या आग्रहाने 'मराठी पाऊल पडते पुढे' (मराठा तितुका मेळवावा) या गाण्यामध्येही त्यांचा आवाज आवर्जून घेतला गेला. लता आणि सुमन कल्याणपूर यांनी एकत्र गायलेले एकमेव गीत 'गलत है, लूट लिया तुमको हुस्न वालोने' (चित्रपट 'चाँद' - १९५९) हे हेमंतजींच्याच संगीतदिग्दर्शनाखालील गीत. पुढे दोघी एकत्र आजपर्यंत गायलेल्या नाहीत. हेमंतकुमारांची मराठीबरोबरच पंजाबी, आसामी, उडिया, गुजराती गाणीही आहेतच; पण हिंदी आणि बंगाली चित्रपटसृष्टीत त्यांनी आपला वेगळाच ठसा उमटवला होता.

सुमारे ५० ते ५५ चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन, जवळजव सर्वच सहगायकांसह गायलेली असंख्य गाणी, इतर गायक आणि संगीतकारांना दिलेली संधी, यामुळेच चित्रपटसृष्टीत त्यांना मान होताच. खरं तर त्यांच्या आवाजाला आणि संगीताला इतरांशी तुलना करताना मर्यादा नक्कीच आहेत, तरीसुद्धा या मायावी सृष्टीत ते अजातशत्रू म्हणूनच ओळखले जात. तसेच 'गंधर्व गायक' म्हणूनही त्यांना वेगळाच मान होता. इतरांशी तुलना करता, त्यांना तसे यश कमीच मिळाले. सन १९८५ मध्ये 'विश्वभारती'ची 'डी-लिट' पदवी, १९८७ मध्ये संगीत नाट्य अकॅडमीचा पुरस्कार, 'नील अक्षर निचे' या बंगाली चित्रपटाला 'राष्ट्रपती सुवर्णपदक' मिळाले; तर 'पद्मश्री' पुरस्कार त्यांनी स्वतःच नाकारला होता.

त्यांचा विवाह बंगाली गायिका बेला मुखोपाध्याय (मुखर्जी) यांच्याशी झाला (१९४५). मुलगा जयंत, तर मुलगी रानो मुखर्जी 'नानी तेरी मोरनी को...' (मासूम) या गीतांसाठी प्रसिद्ध असलेली - दोघांनाही चित्रपटसृष्टीत विशेष जम बसवता आला नाही, पण सून 'मौसमी चॅटर्जी' मात्र बऱ्यापैकी प्रसिद्ध होती.

अनेक दिग्गजांच्या स्पर्धेतही आपल्या 'धीर-गंभीर' व घोगरट स्वरांनी रसिकांना मोहविणारा आणि स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करणारा असा हा गुणी संगीतकार-गायक २६ सप्टेंबर १९८९ रोजी स्वर्गवासी झाला. त्यांचे सांगीतिक धन नेहमीच त्यांचे स्मरण करून देईल. म्हणूनच म्हणावेसे वाटते की...

'जाने वो कैसे लोग थे जिनके प्यारको प्यार मिला' (प्यासा) आणि 'हमने बस कलियाँ माँगी - सुमधुर खजाना मिला!'

(या लेखासाठी सुभाषचंद्र जाधव व श्रीकांत देशपांडे यांच्या पुस्तकांचा संदर्भासाठी, तसेच मित्रवर्य जे. के. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाचा आधार घेतला आहे. मी सर्वांचाच ऋणी व आभारी आहे.)

❖

## सौ. माणिक मराठे यांचे निधन

पुण्यातील कर्वेनगर येथील सौ. माणिक मधुकर मराठे (वय ७३) यांचे नुकतेच अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती निवृत्त एअर कमोडर मधुकर मराठे, दोन विवाहित मुली असा परिवार आहे. ज्येष्ठ क्रीडा पत्रकार वि. वि. करमरकर यांच्या त्या कनिष्ठ भगिनी होत. विविध सामाजिक कार्यांत त्यांचा सहभाग असायचा. अंध विद्यार्थ्यांकरीता ब्रेल लिपीमध्ये पुस्तके तयार करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता. ब्रेल लिपीतील आठ हजारांहून अधिक पुस्तके त्यांनी तयार केली होती. त्याचप्रमाणे उत्तराखंडातील पूरग्रस्त, जम्मूतील विस्थापित हिंदू मुलींच्या मदतीसाठीही त्या अखेरपर्यंत कार्यरत होत्या.

**मराठे प्रतिष्ठानद्वारा सौ. माणिक मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली**

# ‘मराठे प्रतिष्ठान’ १० वे अखिल भारतीय कुलसंमेलन

• **सौ. उर्मिला श्रीनिवास मराठे** (पृ. ३८९), पुणे भ्रमणध्वनी - ८२७५१४१४६०

**सांगली वृत्तांत (दि. २३, २४ जानेवारी २०१६)**

सांगलीच्या खरे मंगल कार्यालयातील एक संध्याकाळ अत्यंत उत्सावर्धक वातावरणाने भरलेली अनेकांची गजबज, गडबड आणि काहींची स्वागत करण्याची लगबग अत्यंत आनंददायी असे वातावरण. मराठे कुलबांधव हळूहळू एकत्र जमत होते. दि. २३-१ चा ५ वाजण्याचा सुमार. सांगलीकर बांधव परगावाहून येणाऱ्या आपल्या बांधवांचे हसून स्वागत करीत होते. मराठे कुलबांधवांचे हे १० वे कुलसंमेलन. गणपतीरायाच्या कृपेने सांगली मुक्कामी करण्याचे ठरले, ते २०१५ साली आणि एक छोटासा मेळावा घेऊन सांगलीकरांनी अखिल भारतीय संमेलनाला होकार भरला आणि ते जय्यत तयारीला लागले. २३ आणि २४ जानेवारी २०१६ संमेलनाची तारीख ठरली आणि जवळजवळ २२५ कुलबांधवांनी संमेलनास उपस्थित राहून सांगलीकरांना उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला.

२३ जानेवारी दुपारचे ५ वाजलेले. संस्कृत रामायणाने कार्यालयामधील वातावरण प्रसन्न आणि मंगलमय झाले होते. आधी रामायणाचे सूर मंजूळ. कुणालाही आणि कुठल्याही क्षणी मनाला प्रफुल्लीत करणारे संस्कृतातला हा अनुवाद सुद्धा खूपच मन प्रसन्न करणारा वाटला, संस्कृत शब्द आज फारसे कानावर पडत नसले तरीही ‘गीत रामायण’ असल्यामुळे ते मनाला भिडत होते आणि थोडे कळतही होते.

एकीकडे सर्व सभासदांचे तिळगूळ आणि पेढा देऊन स्वागत करण्यात येत होते. महिलांना आवडणारे आकर्षित करणारे सोनचाफ्याचे फूल देऊन कौतुक करण्यात आले. अर्थातच त्यामुळे महिलावर्ग एकदम खुश. तसेच एकीकडे इडली-सांबार चहा कॉफी अल्पोपहार. त्याचाही स्वाद-आस्वाद घेण्यात मंडळी दंग होती.

व्यासपीठही खूपच छान सजविण्यात आले होते. परशुरामाची मोठी तसबीर व्यासपीठावर विराजमान होती. त्यामुळे चित्तपावन कुलोत्पन्नांचे संमेलन आहे हे नजरेत ठसत होते. त्याखाली सांगलीकरांचे आराध्यदैवत गणपती विराजमान झाले होते. त्यामुळे देव-देवतांच्या आशीर्वादाने संमेलन यशस्वी होणार ह्याची ग्वाही पटत होती. मंगल प्रसन्न वातावरणात समारंभास सुरुवात झाली.

प्रथम मराठे प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांनी प्रास्ताविक केले. आपण संमेलन का घेतो, कशासाठी घेतो, उद्देश काय हे त्यांनी स्पष्ट केले. संमेलनाची वर्गणी अगदीच अल्प का ठेवण्यात आली असे काही जणांनी त्यांना विचारले असता जास्तीत जास्त संख्येने सर्व मराठे बांधवांनी एकत्र यावे यासाठी वर्गणी कमी ठेवण्यात आली असे कार्यवाहांनी सांगितले. आणि युवा प्रतिनिधी मंदार मराठे याच्याकडे कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी सोपवली.

मंदारने मराठे प्रतिष्ठानला ३५ वर्षे पूर्ण झाल्याचे सांगून हे दहावे कुलसंमेलन असल्याचे सांगितले व संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. वि. म. मराठे यांस व्यासपीठावर येण्याची विनंती केली. स्वागताध्यक्षांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि मान्यवरांना व्यासपीठावर येण्याची विनंती केली. संस्थापक विश्वस्त श्री. वा. ग. मराठे, विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे, कार्याध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, उपकार्याध्यक्ष श्री. सी. गो. खांबेटे, गोवा प्रतिनिधी श्री कालिदास मराठे, पुणे प्रतिनिधी श्रीनिवास मराठे, बडोदा प्रतिनिधी श्री मोहन मराठे, भोपाळ प्रतिनिधी श्री. श्रीपाद मराठे या सर्वांनी व्यासपीठावर येऊन दीपप्रज्वलन केले व संमेलनास प्रारंभ झाला.

यानंतर पुण्याच्या सौ. अंजली मराठे व सौ. मंजीरी मराठे यांनी ‘ओंकार अनादी अनंत अथांग अपरंपार’ हे ईशस्तवन सादर केले युवापिढीचे सहकार्याने संमेलन साकारण्यास खूप मदत झाली असल्याचे स्वागताध्यक्षांनी सांगितल्यावर संमेलनातील अनेकविध कार्यक्रमांना सुरुवात झाली. सर्वप्रथम कल्याणचा युवा कलाकार भूषण मराठे याचे तबलावादन झाले. तबलावादनाचे व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या भूषणने त्रिताल अशा सफाईने वाजवला की तो श्रोत्यांची दाद घेऊन गेला.

प्रथम संध्या खांबेटे यांचे गायनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. त्या नारायण बोडस यांचेकडे शिक्षण घेत आहेत. त्यांना भूषण मराठे तबला आणि अभय पोतदार यांनी पेटीवर साथ केली. त्यांनी स्वतः रचलेल्या कवितातून निवेदन केले. ‘भेटलो आज सारे आपण’ किंवा ‘ऋणानुबंध हे कधीच माहीत नाहीत कुणा’ अशा छोट्या छोट्या काव्यातून निवेदन सादर करीत आपले सुश्राव्य गायन सादर केले. खरा तो प्रेमा हे नाट्यगीत आणि मधु मागसी माझ्या अशा गीत गायनांनी रसिक भारावून गेले. दिगंबरा दिगंबरा, पतीत तू पावना, विठ्ठल बोलवा, विठूचा गजर अशा भावपूर्ण आणि भक्तिपूर्ण अभंग गीतांनी त्यांचा कार्यक्रम रंगला. नंतर रसिकांच्या आग्रहावरून ‘उगवला चंद्र पुनवेचा’ हे

नाट्यगीत गाऊन त्यांनी आपल्या कार्यक्रमाची सांगता केली. यानंतर छोट्या देवांग मराठेने त्रितालात सुंदर तबला वाजवून वाहवा मिळविली.

मग व्यासपीठावर आल्या सौ. सुयोग मराठे या पंडीत सी.आर. व्यास यांच्या शिष्या असून सवाई गंधर्व कार्यक्रमात गायील्या आहेत. त्यांनी राग मुलतानी सादर केला. त्यानंतर उपशास्त्रीय संगीतात प्रभा अत्रे यांनी कंपोज केलेली विरहीणीची आर्तता 'गिरके आयी बदरीया' या विरहीणीतून अत्यंत प्रभावीरित्या सादर केली जिनकेही हृदयमे श्रीराम वसे हे भजन आणि 'जोहार मायबाप जोहार' हा चोखामेळ्याचा अभंग गाऊन त्यांनी आपल्या कार्यक्रमाची सांगता केली.

नंतर श्री मोरेश्वर मराठे यांनी काव्यवाचन केले 'हे अतिरेकी येतात कोठून?' आणि 'फुल-झाडांना असे कसे कळत नाही?' अशा कविता त्यांनी वाचून दाखविल्या.

आता व्यासपीठावर आले ते मराठे प्रतिष्ठानचे विद्यमान अध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस त्यांनी सिव्हील इंजीनिअर असल्यापासूनचे अनेक अनुभव कथन केले. वालचंदनगर कॉलेज मधील त्यांचे शिक्षण सांगलीशी जुना असलेला ऋणानुबंध त्यांनी कथीत केला. नोकरीतील पहिला प्रोजेक्ट मुळशी लेक ताम्हीणी घाट येथे आलेले अनुभन त्यावेळची कामगारांची स्थिती ६३-६४ साली कामगारांना असणारा ३९रु. पगार आदी अनेक अनुभव कथन केले.

पहिल्या दिवसाचा कार्यक्रम असा भरगच्च झाला. साधारण साडे नऊ वाजल्यामुळे उदरभरणाची आठवण होणे साहजिकच होते. त्यामुळे भोजनकक्षाकडे अनेकांची पावले चट्कन् वळली. खिचडी, कढी, लेकुरवाळी भाजी अशा सुग्रास भोजनावर सर्व सभासदांनी ताव मारला.

दुसरा दिवस अर्थातच २४ जानेवारीचा साधारणपणे ८ ते साडे आठच्या दरम्यान सर्व सभासद वर्ग तयार होऊन कार्यक्रमाच्या हॉलमध्ये उपस्थित झाला. उपमा आणि चहा कॉफीचा आस्वाद घेऊन सर्व सभासद खुर्च्यांमध्ये आसनस्थ झाले.

प्रथम श्री. अरुण मराठे, (दादर, मुंबई) यांनी संधीवात व्यायामामुळे कसा घालवावा याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. फायबरचे बनविलेले ॲक्युप्रेशर द्वारा उपयोगात येणारे उपकरण त्या द्वारा व्यायाम कसा करावा हे त्यांनी दाखवून दिले. हे उपकरण फायबरचे बनविले असल्यामुळे प्रवासातही आपण आपल्याबरोबर वागवु शकतो हे सांगितले.

आपल्या परिवारातील श्री. नंदकुमार मराठे यांनी 'माझे सामाजिक योगदान' या विषयावर आपले विचार मांडले. त्यांनी आपले गोत्र 'कपि' आहे असे न म्हणता आपण ते गोत्र स्विकारले आहे असे विचार मांडले. मी एक आहे. ह्या मी चा अनेक होणे व हळूहळू व्यापक परिवार होणे असे घडले पाहिजे असा विचार मांडला. आपण खरंच व्यापक झालो आहोत का? प्रत्यक्ष व्यवहारात आपले मन हे दुभंगलेले जाणवत असते. म्हणून प्रत्येकाचे वेगळे अस्तित्व असले तरी त्यातल्या 'मी'ला व्यापक करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. यासाठी मोठ्या वृक्षाचे उदाहरण त्यांनी दिले. फांद्या, फळे मूळ खोड या सर्वांत वृक्षाचा जीव हा एक घटक आहे. त्याला व्यापक करण्याने छोट्या झाडाचे वृक्षात रूपांतर होते. यासाठी वेळ द्रव्य शक्ति हे महत्त्वाचे घटक आहेत. यामुळे 'मी' आपली शक्ति वेळ अनेकांना देऊ शकतो. मला माझ्यासाठी काय देता येईल याचा प्रत्येकाने विचार करावा असे मत लेखक नंदकुमार मराठे, यांनी मांडले श्री. मराठे यांनी 'कर्मयोगी स्वामी विवेकानंद' या त्यांच्या पुस्तकाच्या काही प्रती आणल्या होत्या. त्या मराठे कुलबांधवांना विनामूल्य दिल्या.

यानंतर गोव्याच्या सभासदांनी आपल्या खास चित्तपावनी भाषेत कार्यक्रम सादर केला. प्रथम श्री व्याडेश्वराय नमः, योगेश्वरी परमेश्वरी नमः ही स्तोत्रे म्हणून वातावरण भक्तिमय केले. मग खास बोलीभाषेत संमेलनाबद्दल विचार मांडले व आजही 'चित्तपावनी' भाषेला जीवित ठेवले पाहिजे हा विचार ठासून मांडला. यानंतर महिलांनी पारंपारिक खेळांचे दर्शन घडविले. दुर्ग येथील श्री केशव मराठे यांनी संमेलनाबद्दल काही विचार मांडले. बडोद्याचे प्रतिनिधी श्री. मोहन मराठे यांनी तेथील ब्राह्मणसभेबद्दल माहिती दिली आणि पुढील संमेलन बडोदे येथे घेण्याचे आमंत्रण दिले. त्याचे सर्वांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. यानंतर श्री. अजिंक्य मराठे यांनी 'हर हर शिव ओम' व 'नाम घेता वाया गाले अैसा कुणी ऐकीला' हे अभंग सादर केले. त्यांना भूषण मराठे यांनी तबल्याची साथ केली. अनेक कलाकारांनी अत्यंत उत्स्फूर्ततेने व्यासपीठावर येऊन आपली कला सादर केली. त्यात शिरूर येथील श्री. गणेश मराठे यांनी संत नामदेवाचा अभंग सादर केला. आदित्य मराठे यांनी बासरीवादन केले.

आजकाल वृद्धांना आवश्यक असणाऱ्या विमा योजनेबद्दल अमित मराठे यांनी मौलिक विचार मांडले. त्यांचे दोन मित्र श्रीकांत व रोहित यांनी इन्शुअरन्स बद्दल बरीच माहिती दिली. हेल्थ इन्शुअरन्सची विभक्त परिवारामुळे असणारी गरज सांगितली व पूर्ण चौकशी अंती विमापॉलीसीमध्ये गुंतवणूक करण्याची सूचनाही केली. आता दुपारचा १ वाजण्याची वेळ होत आली होती. त्यामुळे अर्थातच सुग्रास भोजनासाठी भोजनालयाकडे सर्वांची पाऊले वळली.

भोजन उपरांत सौ. मेधा मराठे यांनी व्याडेश्वर देवस्थानाबद्दल माहिती सांगितली परशुरामाचे महेंद्र, पर्वतावरील वास्तव्य समुद्र हटवून भूमी निर्माण अशी सर्व माहिती कथीत केली. यानंतर छोट्या मयंकने न घाबरता देहाची तिजोरी हे गीत म्हटले. गायत्री लेले यांनी केलेले प्रवासवर्णन मन आकर्षून घेणारे होते. सातारा येथील (लिंब) विहीर, विशाखापट्टण येथील पाणबुडी अशी अनेक वर्णने रंजकरित्या सादर केली. स्त्रियांचे बाबतीत ५ 'प' अनुकूल असतील तर त्यांचा सुखद प्रवास होऊ शकतो असे वेगळेच पण उत्तम विचार मांडले. १) आईला परवानगी – पुत्राची २) पत्नीला पतीची ३) उपलब्धता – पैशाची ४) उत्तम – प्रकृती ५) प्रवासाचे आरक्षण अशा वेगळ्या मुद्यांमुळे त्यांचे भाषण रंगले.

सांगलीच्या चित्तपावन संघाचे नंतर श्री. पोंक्षे यांनी आपले काही विचार मांडले, नंतर सर्व विश्वस्त कार्यकारीणी मंडळाचा परिचय करून देण्यात आला. तसेच मराठे परिवारातील बऱ्याच जणांनी मराठे परिवारात काय सुधारणा ह्यात याबद्दल आपापली मते मांडली. सर्व सांगलीकरांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. स्वागताध्यक्ष श्री. वि. म. मराठे, श्री. भास्करराव मराठे, श्री. मोरेश्वर मराठे व युवा पिढीने जे अथक श्रम घेऊन संमेलन यशस्वी करण्यासाठी जे कार्य केले त्याबद्दल त्यांनाही गौरविण्यात आले कस्तुरी मराठे, श्रीपाद मराठे, संतोष मराठे, राहुल विद्वांस, भूषण मराठे, इ. सर्व व या कार्यक्रमात ज्यांनी भाग घेतला कार्यक्रम सादर केला त्यांचा भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला व संमेलनाची सांगता झाली.

❖

---

# अध्यक्षांचे मनोगत



**०१ मार्च २०१६**

**सर्व कुलबंधुभगीनींना माझा व कार्यकारी मंडळाचा नमस्कार.**

सर्व उपस्थित कुलबंधुभगीनींच्या सहकार्याने आपल्या मराठे प्रतिष्ठानच्या दहाव्या अखिल भारतीय संमेलनाचा दिमाखदार सोहळा सांगलीत दि. २३ व २४ जानेवारी रोजी संपन्न झाला.

जास्तीतजास्त कुलाबंधावांना संमेलनात सहकुटुंब सहभागी होता यावे या उद्देशाने प्रवेशशुल्क नाममात्र रु. २००/– असे ठेवले होते. जमाखर्चाचा मेळ बसवण्यासाठी कार्यकारी मंडळाने प्रसंगी पदरमोड करण्याची तयारी ठेवली होती. मला आपणास सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे की कुलबांधवांनी उत्स्फूर्तपणे दिलेल्या देणग्यांमुळे तुटवडा आला नाही. या सर्व देणगीदारांचे मनःपूर्वक आभार.

या सोहळ्यातील विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे तरुणांचा सहभाग. या तरुणांनी ते काय करू शकतात हे आपल्याला दाखवून दिले. समारंभाची आखणी, त्याचं आयोजन आणि तो यशस्वीरीत्या पार पाडण्याची त्यांची क्षमता वाखाणण्याजोगी आहे. तसेच आपल्या कुलबांधवात एका पेक्षा एक सरस कलाकार आहेत याचीही प्रचीती आली. विशेष म्हणजे त्या सर्वांचे कौतुक करण्यास प्रतिष्ठानच्या सभासदांची उपस्थितीही विक्रमी होती.

आपल्या सहकार्याने यापुढेही सर्व संमेलने अशीच दिमाखदारपणे संपन्न होतील याची मला खात्री आहे.

धन्यवाद.

आपला,
**रमाकांत विद्वांस** (पृ. ६२३)
३१, गुडविल अशुअरन्स बिल्डिंग,
अध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान
मनमाला टेंक रोड, स्टारसिटी सिनेमा समोर,
माटुंगा (पश्चिम), मुंबई ४०००१६.
दूरध्वनी : २४३०५२६०
भ्रमणध्वनी : ९८२०२२४०१४

---

**ह स रे**

**वसंत** : तू किती वाजता उठतो?
**मित्र** : मी तर सूर्याची किरणे खिडकीतून अंथरूणावर पडली की उठून जातो.
**वसंत** : खूपच लवकर उठतो तू.
**मित्र** : माझ्या बेडरूमची खिडकी पश्चिमेकडे आहे.

**हि त गु ज** — **व्हॉट्स अप!**

**मास्तर** : गण्या, विन्या शाळेत यायला उशीर का झाला?
**गण्या** : मी स्वप्नात अमेरिकेला गेलो होतो.
**विन्या** : आणि मी गण्याला आणायला गेलो होतो.

# सभासद शुल्क व देणगीदार : मार्च २०१५ ते फेब्रुवारी २०१६

**देणगीदार : वैद्यकीय मदत निधी: रु. १,००,०००/-**

मराठे बळवंत (मिलिंद) अरविंद- पुणे

**देणगीदार : वैद्यकीय मदत निधी :**

ब्रिगे.(नि) धनंजय विनायक विद्वांस-पुणे (९०००/-), मराठे संजय चिंतामण - गोवादी, मुंबई (८०००/-), ॲड. डॉ. नंदकुमार अच्युत-गोरेगाव, जि. रायगड (५०००/-), सुहास प्रभाकर - पुणे (५०००/-) कमलेश ए.- डोंबिवली (२,५००/-), खांबेटे संध्या सदानंद - ठाणे (१,५००/-), मराठे वसंत कृष्णाजी-पुणे (१,०००/-), अरुण दत्तात्रय - पुणे (१०००/-), माधव वासुदेव (१०००/-)

**देणगीदार : वैद्यकीय मदत निधी: रु. ५००/-**

मराठे अरुण दत्तात्रय-पुणे, डॉ. रवींद्र दिनकर-विरार, विजय विष्णू - पुणे, रमेश भिकाजी - पुणे, अरुण शिवराम- ढवळी, गोवा, दिलीप आत्माराम - बोरीवली, मीनल - पुणे, प्रमोद भास्कर - पुणे, अनंत कृष्ण - पुणे, विष्णू नारायण - पुणे, मोहन मधुकर - पुणे, संतोष नारायण - खारघर, निलांबरी रमेश- पुणे

**देणगीदार : वैद्यकीय मदत निधी : रु. ४००/-**

मराठे विजय भालचंद्र-पुणे

**देणगीदार : वैद्यकीय मदत निधी : रु. २००/-**

मराठे मोरेश्वर लक्ष्मण-सांगली, श्रीकृष्ण सिद्धेश्वर- वडगाव, पुणे, आमोद केशव- वडगाव, पुणे

**देणगीदार : शैक्षणिक मदत निधी :**

श्रीमती. मराठे अलका रवींद्र-मिरज (२१०००/-), खांबेटे संध्या सदानंद- ठाणे (१५००/-)

**देणगीदार : हितगुज निधी :**

खांबेटे मधुसूदन रामचंद्र - ठाणे (१०,०००/-), मराठे विठ्ठल यशवंत- बेळगाव, कर्नाटक (२५०/-+ २००/-),

**देणगीदार : तरता निधी :**

विद्वांस रमाकांत माधव (१००००/-+१,००१/-), वामन गणेश-पुणे (५०००/-), मोहन सदाशिव-खार, मुंबई (२०००/-), उदय दत्तात्रय-मुलुंड, मुंबई (२०००/-), संतोष नारायण (१२००/-), सुयोग संतोष (१०००/-), सदानंद विष्णू (१०००/-), तन्वी इन्वेस्टमेंटस (१०००/-), शैलेश विनायक-वर्सोली (१०००/-), मराठे प्रभाकर दामोदर (१०००/-), आनंद यशवंत-ठाणे (७५१/-), सुरेश गोविंद- डोंबिवली (५०१/-), सौरभ सुरेश (५००/-), मराठे श्रीकृष्ण एस. (५००/-), डोके कुमुद सुदाम (५००/-), शरद अरुण (२५१/-), श्रीनिवास अनंत (२५१/-), मराठे माधव वा. (२००/-)

**वर्गणीदार : हितचिंतक सभासद (रु. ५०००/-)**

डॉ. सौ. सुधा सुधाकर साने (दादर)

**वर्गणीदार : हितगुज आजीव (रु.२०००/-)**

मराठे भास्कर गोपाळ - सांगली, सदाशिव धुंडिराज - बोरीवली, कमलेश ए - डोंबिवली, डॉ. रवींद्र दिनकर - विरार, सौरभ सुरेश - पाली, संकेत श्रीधर - पुणे, सुमेध गजानन - कल्याण, योगेश शंकर - देऊळवाडा, गणेश अनंत - घोडनदी, श्रीनिवास केशव - ठाणे, नरेंद्र भास्कर - वडोदरा, नारायण काशिनाथ - डिचोली गोवा, संदीप परशुराम - वाल्सई गोवा, श्रीराम दत्तात्रय - सांगली, रामकृष्ण भास्कर - डोंबिवली, प्रमोद अरुण - अमरावती, ब्रिगे.(नि) विद्वांस धनंजय विनायक - कोथरूड पुणे, खांबेटे केदारनाथ प्रफुल्ल - टिटवाळा, कस्तुरे अशोक मनोहर - डोंबिवली, मराठे नंदकुमार अच्युत - गोरेगाव जि. रायगड, माधवी गजानन - माहीम मुंबई. चंद्रशेखर विठ्ठल - पुणे, डॉ. रामकृष्ण लक्ष्मण - पुणे, सुहास प्रभाकर - पुणे, संजय चिंतामणी - गोवंडी, मुंबई, लिमये सुप्रिया-पुणे, अशोक कस्तुरे - डोंबिवली

**वर्गणीदार : हितगुज आजीव (रु.१५००/-)**

खांबेटे विनायक विष्णू - बोरीवली, मराठे श्रीकृष्ण भास्कर - नाशिक, सचिन किरण - नाशिक

**वर्गणीदार : हितगुज आजीव (रु.१०००/-)**

मराठे भास्कर दत्तात्रय - मिरज, निलेन्द्र दत्तोबा - धारबांदोडा, गोवा, मोरेश्वर हरी - थिवी, गोवा

**वर्गणीदार : आजीव सभासद (रु. ५००/-)**

विद्वांस राजीव अरुण - पुणे, ब्रिगेडीअर (नि) धनंजय विनायक - पुणे, नृपेन सुरेश - चौल, चौधरी मेघना संजय - रत्नागिरी, खांबेटे विनायक विष्णू - बोरीवली, पेंडसे शर्वरी सोहल - पुणे, मराठे भास्कर गोपाळ - सांगली, विलास अशोक - घाटकोपर, श्रीकृष्ण भास्कर - नाशिक, चंद्रशेखर देवदास - ठाणे, सदाशिव धुंडिराज - बोरीवली, कमलेश ए. - डोंबिवली, ह. मो. - पुणे, सचिन किरण - नाशिक, आमोद केशव - पुणे, सौरभ सुरेश - पाली, सुरेश शंकर - पाली, श्रीकांत दिनकर - पडेल, दिनेश विनायक - पडेल, भूषण सुधाकर - कल्याण, अमोल माधव - नाहूर, धनश्री विजय - पुणे, श्रीपाद मेघश्याम - कल्याण, कमलिनी माधव - पुणे, संकेत श्रीधर - पुणे, हरेश सदानंद - हुबळी, मिलिंद

सुधाकर – पुणे, योगेश शंकर – पाली, अविनाश विष्णू – चिपळूण, अजय विष्णू – मुटाट, आशिष मोरेश्वर – थिवी, गोवा, गणेश अनंत – घोडनदी, श्रीनिवास केशव – ठाणे, मंदार पद्माकर – नालासोपारा, अनंत केशव – सांगली, मनोहर गोविंद – बोरीवली, अनिल महादेव – कोथरूड पुणे, रोहित दीपक – पोंडा गोवा, नारायण काशिनाथ – डिचोली गोवा, संदीप परशुराम – वाल्सई गोवा, मेहेंदळे स्मिता प्रशांत – सांगली, विद्वांस मिलिंद प्रकाश, मराठे श्रीपाद दीपक – रत्नागिरी, शैला श्रीपाद – रत्नागिरी, विद्वांस सतीश महादेव, खांबेटे केदारनाथ प्रफुल्ल – टिटवाळा, मराठे सुधीर अनंत – कल्याण, विश्वजीत रवींद्रनाथ – इचलकरंजी, माधवी गजानन – माहीम मुंबई, चंद्रशेखर विठ्ठल – पुणे

**–: अत्यंत कळकळीची विनंती :–**

आपण सभासदत्व शुल्क अथवा देणगी दिली असूनही आपलं नाव या यादीत नसल्यास/आपल्याला पावती मिळाली नसल्यास कोषाध्यक्ष श्रीनिवास मराठे (भ्रमणध्वनी ९८३३२१६४६८) यांच्याशी संपर्क साधावा.

प्रतिष्ठानला देय शुल्क अथवा देणगी आपण IDBI बँकेच्या कोठल्याही शाखेत जाऊन, 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने IDBI बँक, दादर-प, या शाखेतील बचत खाते क्र. ०५०११०४०००४३५१९ मध्ये रोख किंवा चेकने भरू शकता. वरील खाते क्र. १६ आकडी असून सुरुवातीचा ० आकडा लिहिणे अत्यावश्यक आहे. अन्यथा दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात रक्कम जमा होऊ शकते.

## आरोग्यं धन संपदा

# डोळा : निसर्गाची अमूल्य देणगी



'डोळ्यांची जादू' वर्णन करू गेल्यास मोठमोठे ग्रंथ देखील अपुरे ठरतात. यासाठीच हा अवयव सौंदर्यामध्ये मोलाची भर टाकणारा म्हणूनच ओळखला जातो.

१. डोळे जर जडावल्यासारखे वाटत असतील किंवा थकवा, प्रदूषण यांमुळे चुरचुरत असतील तर ताबडतोब कच्च्या बटाट्याची किंवा काकडीची काप काढून (गोल चकत्या सालं काढून) ती डोळ्यावर ठेवावी.

२. डोळ्यात जर धुलीकण, कचरा गेला असेल तर लगेच डोळा धुवावा. डोळ्यावर पाण्याचे फवारे घ्यावेत किंवा स्वच्छ बशीत पाणी घेऊन त्यात १० ते १५ मिनिटे डोळ्यांची उघडझाप करावी.

३. मधूनमधून डोळ्यावर स्वच्छ कापडाच्या घड्या पाण्यात वा दुधात वा गुलाबजलात बुडवून ठेवाव्या.

४. सारखं सारखं टीव्ही, संगणकावर बसून काम करू नये. अधूनमधून हाताच्या तळव्यांनी डोळे झाकून घ्या. अंधारात डोळ्यांना विश्रांती मिळते. त्यामुळे थकवा न जाणवता आराम पडेल. सारखे सूर्यकिरणांकडेही टक लावून बघू नका. उन्हात जातेवेळी डोक्यावर टोपी वा छत्री तसेच गॉगल लावावा. उन्हातून आल्यावर तसेच झोपून उठल्यावर डोळे थंड पाण्याने स्वच्छ धुवा. काजळ किंवा इतर वस्तू डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार डोळ्याला लावा. अन्यथा त्याचे इतर परिणाम घडण्याची शक्यता जास्त असते.

५. चष्मा असेल तर तो न विसरता वापरत जा.

६. डोळ्यांची जळजळ होत असेल तर सोललेल्या केळ्यांचे आतले साल वा गर डोळ्यांवर ठेवावे. रात्री एक ग्लासभर पाण्यात धणे भिजत टाकून दुसऱ्या दिवशी सकाळी त्या धण्याच्या पाण्याने डोळे धुवावे किंवा त्या पाण्यात कापडाचे छोटे तुकडे भिजवून त्या घड्या डोळ्यांवर ठेवाव्या.

७. आहारात पिष्टमय, प्रथिन, जीवनसत्वयुक्त पदार्थ असावेत. अति गोडपदार्थ सेवन करू नयेत.

८. हिरव्या पालेभाज्या, सातूचे पीठ, दूध, लोणी, डाळींब, गाजर, द्राक्षे, सफरचंद खावे. अति प्रमाणात दही डोळ्यांसाठी अपायकारक असते.

९. मैदानी खेळ (उदा. कबड्डी, लंगडी, खोखो) जास्त प्रमाणात खेळावेत.

❖

# वाचकांचा पत्रव्यवहार

आदरणीय,
संपादिका
डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे
यांसी भा. द. मराठेचा स.न.वि.वि.

मराठे प्रतिष्ठानचा ग्राफ दिवसें दिवस उंचावत आहे व महाराष्ट्रात मप्र एक आयडीयल म्हणून मानले जाते. त्याचा सर्व मराठे परिवारास अभिमान वाटणे साहजिकच आहे.

हितगुजची वाट पहात असतो. त्यानंतर घरात वाचला जातो व चर्चा होते. छान वाटते. आपणच आपले मंडळींचे कौतुक करणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे मला वाटते, असो.

सप्टेंबर २०१५चा हितगुज खूपच वाचनीय व खूप अशी वेगळी माहिती व हितगुजचे माध्यमाने ओळख होते एवढे खरे.

१. शस्त्रक्रिया – श्री रमाकांत लेख दोनदा वाचला व प्रत्येक पेशंटने अशा निर्धार जिद्द व सतत चेहऱ्यावर हास्य ठेवले तर आजार व भयंकर आजारावरही सहजपणे मात करता येते. श्री विद्वांसना मनःपूर्वक नमस्कार तर करतोच पण त्यांच्या जिद्दीबद्दल त्यांना मनःपूर्वक अभिवादन!

२. जप्ती – सौ. सुमेधा मराठे. तुम्ही हा प्रसंग अंकामध्ये देऊन शिक्षण खाते प्रामाणिक विद्यार्थी पालक व शिक्षक यांना एकप्रकारचा आदर्श घालून दिलात.

खरंच या शिवरामच्या शैक्षणिक आयुष्यातील जप्तीचा हा प्रसंग वाचून मन खूप खिन्न दुःखी झाले. मी सुद्धा एक आदर्श शिक्षक आहे व मलाही शिक्षक या नात्याने अशाच प्रकारचे अनुभव आहेत.

त्या शिवरामला शतशः धन्यवाद परमेश्वर त्यांचे कल्याण करो. कुशल असो.

३. माझी आई – सुचित्रा राणे हिने अनोखी सानेगुरुजींची आई समोर उभी केली. आईची महती, प्रेम, वात्सल्य व त्या कुटुंबावर आलेले प्रसंग वाचताना खूपच गहिवरून आले.

आयुष्यात आई हेच तर दैवत आहे प्रेम आहे. जिव्हाळा आहे. आश्रय आहे. असो. सर्व अंक छान काय काय लिहिणार! बाकीचे लेख खूप छान आहेतच. एकूण सर्व ठीक सुंदर

पुन्हा एकदा आपणास धन्यवाद. आपल्या सर्व कमिटी मेंबर्सना स.न.

कळावे

**भास्कर दत्तात्रेय मराठे**
मोरया ब्लॉक उ. सध्याप्री नगर
मिरज जि. सांगली ४१६४१०
मोबा. : ९४०३९४४१९९

# दिलगिरी

सर्वांच्या सहकार्याने आपल्या मराठे प्रतिष्ठानचे दहावे अखिल भारतीय संमेलनाचा दिमाखदार सोहळा सांगलीत दि. २३ व २४ जानेवारी रोजी संपन्न झाला.

या सोहळ्याचे विशेष म्हणजे तरुणांचा सहभाग. या तरुणांनी पुढाकार घेऊन ते काय करू शकतात हे आपल्याला दाखवून दिले. त्यांची समारंभ आखण्याची व तो अंमलात आणण्याची क्षमता वाखाणण्याजोगी आहे.

त्यांनी आखलेल्या कार्यक्रमाला मी व कार्यकारी मंडळाने पूर्णपणे अनुमती दिली होती. या कार्यक्रमात खालील तीन गोष्टी अनावधानाने राहिल्या. हे तरूण अनुनभवी असल्याने त्याला जबाबदार नसून त्यांची जबाबदारी अध्यक्ष या नात्याने माझी आहे.

१. कार्यक्रम सुरू करण्याआधी, गेल्या वर्षात निधन पावलेले कै. व्ही. के., कै. लक्ष्मणराव आणि इतर कुलबांधवांना आदरांजली वाहण्याचे राहून गेले. त्याबद्दल मी त्या मृतात्म्यांची क्षमा मागतो.

२. कार्यक्रमात, श्री. माधव वासुदेव यांना प्रतिष्ठानच्या संकेतस्थळाच्या निर्मितीसाठी दिलेल्या योगदानाबद्दल व श्री. सदाशिव गोपाळ जोशी यांना कुलवृत्तांताच्या निर्मितीसाठी दिलेल्या योगदानाबद्दल, व्यासपीठावर बोलावून अभिवादन करण्याचे राहून गेले. त्याबद्दल मी त्यांची माफी मागतो.

३. कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीत म्हणायचे राहून गेले. त्याबद्दल भारतमातेची मी क्षमा मागतो.

**रमाकांत विद्वांस** (पृ. ६२३), कार्याध्यक्ष
दूरध्वनी – २४३०५२६०

# सांगली कुलसंमेलन : क्षणचित्रे



श्रीपाद मराठे, भोपाळ मनोगत व्यक्त करतांना



गायन – अजिंक्य मराठे, अलिबाग




युवा प्रतिनिधी : श्रीपाद, रत्नागिरी – अनुभव सांगतांना



गायन – मयांक, सांगली




युवा टीम, अनुभवी कार्यकारिणी सदस्यांसमवेत




कार्याध्यक्ष रमाकांत विद्वांस उपस्थितांना संबोधित करतांना

(चाफळचा श्रीराम)

*लवें नेत्रपातें स्फुरे आजि बाहे। दिनानाथ हा राम येणार आहे।*
*जयाचेनि योगे सुखानंद लोटे। तया देखतां अंतरी बाष्प दाटे।।*



# प्रथम पुण्यस्मरण



*तव कर्तृत्वाची गाता गाथा, नमतो माथा*
*वंदन तुला माते,*
*फेडणार कसे ऋण शब्द अपुरे*
*आम्हा घडविले तर हे भाग्याचि आमुचे*
*तुझ्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण आदरांजली*

**कै. श्रीमती भारती केशव भातखंडे (एक स्फूर्तिशलाका)**
**(जन्म २४-११-१९३२) (निर्वाण ३-३-२०१५)**

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, ॲडव्होकेट सौ. प्राची सविता भिडे, सीए श्री. प्रभाकर दामोदर मराठे वडाळा, डॉ. श्री. सविता वासुदेव भिडे, रोहा, श्रीमती हेमांगी राजीव भातखंडे, कल्याण ● नातवंडे : चि. निरंजन, डॉ. अमेय, सौ. सारिका, सौ. प्रज्ञा, चि. सौ. कां. मधुरा, सौ. सुप्रिया ● नातसूना : सौ. भक्ती, डॉ सौ. पद्मजा ● नातजावई : श्री. योगेश, श्री. चंद्रशेखर, श्री. प्रसाद, श्री. ऋषिकेश पाटणकर ● पतवंडे : चि. ऋषिकेष, अनघा, चि. सुहृद, चि. श्रनेक, चि. अनुराग**

---

**BOOK POST**

If undelivered, Please return to


संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.**



त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**